# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००८ |
| वर्ष | : | नववे |
| अंक | : | १ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १२५**

MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष नववे / अंक १ / जानेवारी २००८

## संपादकीय

### सामाजभिमुख संशोधन

" प्रयोग शाळांतून केले जाणारे संशोधन, विद्यापीठे व महाविद्यालयांतून केले जाणारे संशोधन सामाजिक गरजांचा व्यापक विचार न करता, केवळ पुस्तकी रूपाचे व स्वार्थ बुद्धीने प्रेरित राहील, तोवर विज्ञान समाजाभिमुख झाले असे खऱ्या अर्थाने म्हणता येणार नाही" या आशयाचे पंडित नेहरू यांचे उद्‌गार आठवले की संशोधन क्षेत्रातील, देश म्हणून होणारी वाटचाल तपासून पहायला हवी, याकडे अधिक गांभीर्याने लक्ष द्यायला हवे असे वाटल्याशिवाय राहत नाही. विज्ञान संशोधनाबरोबरच मानव्य शाखांतील संशोधनाच्या दिशाही पडताळून पहायला हव्यात.


समाजभिमुखता म्हणजे समाजातील प्रत्येक घटकाचा, व्यक्तीचा विचार असणारी व्यापक, हितैषी सामाजिक बुद्धी होय. कोणत्याही ज्ञान क्षेत्राचा मूठभरांसाठी उपयोग होणार असेल तर, तसा उपयोग स्वातंत्र्यानंतर लगेच अस्तित्वात आलेल्या व सामाजिक जाणिवा असलेल्या नेतृत्वाला अपेक्षित नव्हता. इंग्रजीत 'आयव्हरी टॉवर' म्हणतात, त्या हस्तिदंती मनोऱ्यात बसणारांची प्रगती होणे, म्हणजे ज्ञान क्षेत्राची प्रगती होणे, वैज्ञानिक पुरोगामित्व येणे नाही.

८ जुलै १९१० रोजी उदात्त हेतू बाळगत स्वातंत्र्यवीर सावरकरांनी मार्सेलिस बंदरात बोटीतून पलायन केले. त्या घटनेचे स्मृतिशताब्दी वर्ष जवळ येत आहे. सावरकरांच्या चरित्राला वळण देणाऱ्या महत्त्वाच्या प्रसंगांपैकी तो एक हे खरे; पण स्वत: सावरकरांनी या संदर्भात काढलेले उद्‌गार महत्त्वाचे आहेत, "मी मार्सेलिसला मारलेली उडी विसरलात तरी चालेल. पण निबंधांत व्यक्त केलेले विज्ञानप्रधान विचार आचरणात आणा असे मला सांगावेसे वाटते." या आशयाचे ते उद्‌गार आहेत. तंत्रज्ञानाच्या वाढता पसाऱ्यात प्रत्येकजण स्वत:ला विज्ञानवादी समजतो. पण सावरकर, नेहरू, गांधी या नावांप्रमाणेच त्याआधीच्या इतिहासात डोकावले तर विज्ञानवादी, जीवन प्रणाली, विज्ञानवादी दृष्टिकोन यांचा अर्थ आपल्या जगण्यातून लोकांपर्यंत अनेकांनी सिद्ध केला आहे.

वैज्ञनिक प्रगतीचा उपयोग समाजाभिमुख झाला तर कितीतरी प्रश्न सोपे होतील व वैज्ञानिक दृष्टीकोनाचा खरा अर्थ समाजाला समजेल. वैज्ञानिक माहितीवर आधारलेली तंत्रप्रधान अशी चार उपकरणे वापरली म्हणजे आपण विज्ञाननिष्ठ झालो असे मानणारेच खूप असतात. याचे कारण विज्ञान तंत्रज्ञान, विज्ञान आणि ज्ञान, ज्ञान आणि माहिती या संकल्पनांतील

(पृष्ठ क्रमांक ४०वर)

# स्वप्न साकारत आहे...



*हे स्वप्न नव्हे एका व्यक्तीचे ! ते आहे समाजातील विचारवंतांचे,*
*हे स्वप्न नव्हे महंमदी मनोऱ्याचे, ते आहे श्रमिक योजनांचे*
*हे स्वप्न नव्हे खुशालवंतांचे, नव्हे ते आरामितांचे*
*नसे ते फावल्या क्षणांचे, गुलजार गादीत विसावतांचे*
*ते असे अहर्निश श्रमांचे, तसे ते असे श्रमोपासकांचे,*
*सदा ध्येयध्यासीं मग्न त्यांचे !*
*हे स्वप्न नव्हे व्यक्तिवैभवाचे, नसे ते आत्मगौरवाचे,*
*ते असे समाजोन्नतीचे, असे ते युवागौरवाचे*
*हे स्वप्न न दिसे एका क्षणीं, न एका दिनीं,*
*न एके यामिनी*
*दिनरात्र मानसी स्फुरे, सतत निद्रानाशही तें करी !*
*हे स्वप्न नसे सानुले, नसे ते चौकटी बांधिले*
*ते असे, भव्यता जयाची महान, सीमा जयाची अस्मान !*
*हे स्वप्न जसे आमुचे, असावे तसे उपस्थितांचे,*
*मुदित मनीं सुस्वागत अपुलें करितां*
*स्वप्न दिसे साकारले*
*आणि हे स्वप्न कसे आहे ते पहा -*
*ओसाड भूमी कर्दमीं जिथे घाण*
*द्वीप साजिरे आज तेथे दृश्यमान*
*ज्ञानसूर्य येथे उगवला, अज्ञान अंधार लोपला,*
*दिनरात्र प्रकाश अर्पी, अस्त न जया कल्पिला.*
*भव्य वास्तू इथे साकारती, दृश्य जयाचें महान,*
*शिल्पही जयांचे विशेषज्ञान देखिती*
*मनी जे सुजाण,*

*दृश्य देखतां जाणवे भव्यता, प्रासाद जणूं सरस्वतीचा,*
*ज्ञानवीणा जिथे झंकारे सदासर्वदा,*
*बगीचे जिथे बहरती फुलाफुलांचे रंगरंगती,*
*उद्यानीं बहरती ताटवे, कारंजी जिथे फवारती.*
*युवायुवतींचे मग्न घोळके, स्वप्न रंगवितां मग्न जे मानसी*
*स्वप्न तयांचे आकार घेई, अनुरागप्रारंभ येथेच होई*
*आचार्य आणि प्राचार्य, सदा इथें रंगती*
*विज्ञानसत्रीं सदा जयांची वाहिली मती,*
*कलावंत, सरस्वतीचे तन्मणी, तसे वैज्ञानिक महान्,*
*इथे जन्मती प्रतिभा जयांची देदीप्यमान*
*भूदल-सागर-सैनिक, वायुपुत्रही इथे निर्मिती*
*शक्तियुक्ति जयांची भारतमातेप्रती*
*नवमानव, नवनागरिक, प्रयत्नीं इथे घडतसे*
*सत्य, शिव, सुंदर जयांचे अणुरेणीं वसे.*
*बालके तव शिशुमंदिरी दाखल होतां,*
*विद्यामंदिरी दौड तयाची न रोखितां*
*नवयुवक हा प्रवेशितां विद्येचे महाद्वार*
*स्वप्न आमुचे तयाभोवती होई साकार*
*नवयुवक हा भारतभूचा सुपुत्र व्हावा,*
*बुद्धि जयाची, शक्ति जयाची भारतभूचा ठेवा*

वा.भा.बैडेकर

(Cover No. 3)




**वर्ष नववे / अंक ७ / जानेवारी २००८**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा.. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १२ वे / अंक ७वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@gmail.com

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | एक झपाटलेला झुंजार इतिहासतज्ज्ञ हरपला | श्री. विश्वनाथ शेंड्ये | ३ |
| २) | मकरसंक्रात | सौ. मालती देवधर | ६ |
| ३) | अरुणाचलम् येथील रमण महर्षी | श्री. शं. बा. मठ | ७ |
| ४) | कुनमिंगची पश्चिमटेकडी: भाविकांचे भक्तिस्थान | डॉ. सुधाकर आगरकर | ११ |
| ५) | भारतीय संस्कृती - - बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | १४ |
| ६) | महाराष्ट्र बालशिक्षण परिषद | स्वाती गोखले | २० |
| ७) | इंग्रजी बालशाळेत भाषा विकासाचा कार्यक्रम-शिक्षकांचा दृष्टिकोन | सौ. प्रिती कुळकर्णी<br>सौ. अपर्णा वरूडकर | २४ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | ३२ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७५ वर्षांहून अधिक काळ शिक्षणक्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान विधी व्यवस्थापन शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व प्रगत अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून विविध उपक्रम संस्था राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धांत उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रांत कार्यप्रवण आहेत.

टी.व्ही., व्हिडिओ, सिनेमा व तत्सम नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. संस्कारक्षम विद्यार्थ्यांना, वाचकांना, नागरिकांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने **'दिशा'** हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

**या मासिकाचे वर्गणीदार होऊन किंवा या मासिकात जाहिरात देऊन आपण आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती !** तसेच, आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपर्क
संपादक, दिशा
**विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे.४०० ६०२**
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

अंकाची किरकोळ विक्रीची किंमत रु. २५/- फक्त.


वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, पिन कोड व दूरध्वनी कळवावा.

**टीप** : वर्गणी /जाहिरात वा देणगीची रक्कम धनादेशाने पाठवावी. धनादेश (चेक) "**विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा**" या नावाने पाठवावा.

# एक झपाटलेला झुंजार इतिहासतज्ज्ञ हरपला

**वादळ**

*इतिहासतज्ज्ञ पु. ना. ओक गेले. त्यांच्या प्रदीर्घ कारकीर्दीची ही नोंद -संपादक*



**पु. ना. ओक**

इतिहासाचे गाढे अभ्यासक पु. ना. ओक यांचे ३ डिसेंबर २००७ रोजी पुणे येथे दुःखद निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ९१ होते. एक झुंजार व वादळी व्यक्तिमत्व अनंतात विलीन झाले, नव्हे इतिहासात जमा झाले.

पुरुषोत्तम नागेश ओक (जन्म २ मार्च १९१७) हे पु. ना. ओक म्हणूनच प्रसिद्ध होते. त्यांचे वडील नागेशराव ओक हे संस्कृतज्ज्ञ होते. विद्वान होते. त्यामुळे घरातच त्यांच्यावर शिक्षण अध्ययनाचे संस्कार झाले. त्यांचे एम्.ए.एल्.एल्.बी.चे शिक्षण इंदूर व पुणे येथे झाले.

वयाच्या २४ व्या वर्षी म्हणजे १९४१ साली ते सेनादलात भरती झाले व सिंगापूरला गेले. १९४२ साली ते जपान्यांचे युद्धकैदी झाले. तेथेच ते सुभाषचंद्र बोसांच्या सहवासात आले व पुढे ते सुभाषबाबूंच्या हिंदी स्वातंत्र्य सेनेच्या संघटक मंडळाचे सदस्य झाले. १९४३ ते १९४५ या कालावधीत त्यांनी मेजर जनरल भोसले यांचे ए.डी.सी. व वैयक्तिक सचिव काम पाहिले.त्यामुळे ते नेताजींच्या अधिक संपर्कात येऊन त्यांचे निकटवर्ती सहकारी झाले.

सन १९४५ - दुसरे महायुद्ध संपले. नेताजींचा ठावठिकाणा मिळाला नाही. नंतर ओकांच्या जीवनाची दिशा बदलली. परंतु स्वदेश प्रेमाने भारलेला तरुण ही त्यांची ओळख मृत्युसमयीही राहिली.

युध्द संपल्यावर दिल्लीतील हिंदुस्थान टाईम्स व स्टेट्स्मन या इंग्रजी पत्रांचे वार्ताहर म्हणून त्यांनी काम केले. त्यानंतर भारत सरकारच्या पंचवार्षिक योजनांचे अधिकारी म्हणूनही ते कार्यरत होते.

ओक यांना बालपणापासूनच इतिहासाची पुस्तके वाचण्याच छंद होता. त्यातच ऐतिहासिक स्थळे पाहण्याची त्यांना ओढ लागली, त्यांतून गोडीही निर्माण झाली.

पुढे प्रौढ वयात उत्तर हिंदुस्थानातील देवळे, मशिदी, कबरस्थाने पाहताना त्यांना या वास्तूंचा इतिहास जाणून घेण्याची तीव्र इच्छा झाली. त्याकरिता त्यांनी सखोल व सूक्ष्म वाचन केले, तद्विषयक सांगितल्या जाणाऱ्या इतिहासाबद्दल शंका निर्माण झाल्या.

त्यानंतर त्यांनी या इतिहास वाचनाच्या जोरावर स्वतःची मते मांडण्यास सुरुवात केली. विविध इतिहास परिषदांमधून इंग्रजी, मराठी भाषेमध्ये आपली मते सप्रमाण मांडून तसेच लेख लिहून प्रसिद्ध केली.

मध्ययुगीन भारतातील मशिदी कबरी इत्यादी मुसलमानांनी बांधलेल्या ऐतिहासिक इमारती मूळची हिंदूची देवालये अथवा महाल होते. त्यांचे पुढे दर्ग्यात अथवा मशिदीत रूपांतर करण्यात आले, हा आपला मुख्य सिद्धांत मांडणारा शोधनिबंध १९६३ मध्ये पुणे येथे भरलेल्या इतिहास परिषदेत सादर केला व इतिहास संशोधन क्षेत्रात प्रचंड खळबळ उडवून दिली. आजवरच्या इतिहास

क्षेत्रातील तज्ज्ञांना व त्यांच्या कार्याला त्यांनी धक्काच दिला. त्यावर आलेल्या जळजळीत व कडवट प्रतिक्रियांमुळे ओकांचे व्यक्तिमत्व अधिकच प्रखर झुंजार व वादळी बनले.

'ताजमहाल - एक शिवमंदिर' या पुस्तकात आपल्या वरील सिद्धांताचा आश्रय घेऊन त्यांनी ताजमहाल हे पूर्वीचे शिवमंदिर अथवा राजमहाल असल्याचे त्यांनी अनेक पुरावे देऊन सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. परंतु वर्तमान कालीन इतिहास तज्ज्ञाना यावर तीव्र मतभेद, वादविवाद आहेत. या दिशेने अभ्यास व्हायला हवा एवढी तरी जाणीव होऊ लागली हे काय कमी आहे?

वरील सिद्धांताला अनुसरून प्राचीन काळात सर्व जगभर भारतीय क्षत्रियांचे साम्राज्य व आर्य जीवन पद्धती अस्तित्वात होती. तसेच भारता बाहेरील मक्का, व्हॅटिकन इत्यादी धर्मपीठे पूर्वी हिंदूधर्माची केन्द्रे होती असाही खळबळजनक सिद्धांत त्यांनी अभ्यासकांपुढे ठेवला. वैदिक आर्य संस्कृतीचा जाज्वल्य अभिमान असल्याने (काही लोकांच्या मते अतिरेकी अभिमान) त्यांनी हे संशोधन केले आहे.

भारताचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहास विकृत दृष्टिकोनातून लिहिला गेला आहे आणि सत्य इतिहासच स्वतंत्र भारताच्या इतिहासतज्ज्ञांनी लिहिला पाहिजे किंवा तसा प्रयत्न केला पाहिजे असे त्यांचे आग्रही मत होते.

हिंदुइझम अब्रॉड, वर्ल्ड ऑफ वैदिक हेरिटज हे आगळे वेगळे संशोधन पुढे मांडणारे ग्रंथ त्यांच्या अभ्यासातून तयार झाले आहेत. ते निश्चितच वाचनीय व विचारांना नवी दिशा दाखविणारे आहेत.

हिंदुस्थानचे दुसरे स्वातंत्र्ययुध्द (१९४७) व नेताजींच्या सहवासात (१९४७) ही त्यांनी लिहिलेली दोन पुस्तके या विषयावरचे दुर्मिळ अधिकृत लेखन म्हणून महत्वाची ठरतील.

'ख्रिश्च्यानिटी इज कृष्ण नीती', 'इस्लामिक हॅवॉक इन् इंडिया', ताजमहल द ट्र स्टोर सम: मिसिंग चॅप्टर्स ऑफ वर्ल्ड हिस्टरी, तसेच त्यांचे अकबरावरचे पुस्तक ही सर्व पुस्तके ओकांच्या इतिहासाच्या गाढ विद्वतेची साक्ष देणारी आहेत, तसेच वैदिक हिंदू धर्मावर प्रगाढ निष्ठा दर्शविणारी आहेत.

एकूणच इतिहासाचे पुर्नलेखन होणे आवश्यक आहे व सत्य इतिहास लोकांपुढे आला पाहिजे असे नुसते मतच मांडून ते स्वस्थ बसले नाहीत. तर त्यांनी

१) इन्स्टिट्यूट फॉर रीरायटिंग इंडिअन अँड वर्ल्ड हिस्टरी पुणे. या संस्थेची स्थापना करून इतिहास पुनर्लेखनाचा पाया घातला. या संस्थेतर्फे प्रसिद्ध होणाऱ्या वार्षिकांमधून मासिकांमधून शोधनिबंध प्रसिद्ध होत असतात ते वाचकाला इतिहास लेखना संबंधी वेगळी दृष्टी देतात. इतिहासाच्या अभ्यासकांना मार्गदर्शक ठरतात.

विल ड्युरांट (USA) हा एक तत्वज्ञ हिंदुस्थानविषयी म्हणतो

`India was the another land of our race and sanskrit the another of European Languages. She was the another of philorophy ----- mother India is in many ways the mother of us all.

हेच तत्वज्ञान उराशी बाळगून ओकांनी भारतीय व वैदिक इतिहाससंबंधी आपली मते अत्यंत आग्रही आणि जहाल स्वरूपात मांडली.

इतिहासा सोबत त्यांचा ज्योतिष शास्त्राचा ही त्यांचा अभ्यास होता. ते वार्षिक राशि भविष्य हि मासिकांमध्ये लिहीत असत. वार्धक्यात सुद्धा त्यांची तब्बेत उत्तम होती. दृष्टी ही उत्तम होती.

असा हा मनस्वी इतिहासतज्ञ आज काळाच्या पडद्या आड गेला आहे. कोणास ठाऊक, या पुढील काळात

भुतं जगात नसली तरी माणसांच्या मनात असतात.

त्यांच्या सिद्धातांना जगन्मान्यताही मिळेल. कदाचित समीकरणे बदलतील, सत्याचा विजयही होईल. पण त्यासाठी खूप वाट पाहावी लागेल. इतिहासातील हा एकांडा शिलेदार आता दिसणार नाही.

त्यांचे सिद्धान्त खरे ठरावेत व त्यांना शांती लाभावी या शब्दांत त्यांना श्रध्दांजली वाहू या!

या लेखाचे लेखक श्री विश्वनाथ शेंड्ये हे असून ठाणे येथील प्राच्य विद्या अभ्यास संस्था, ठाणे या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयाचे ग्रंथपाल आहेत. या ग्रंथालयात संदर्भासाठी पु. ना. ओक यांची खालील पुस्तके उपलब्ध आहेत.

१) Some Missiry Chaptors of world History (दा.क्र. २२५)

२) Tajmahal was a Rayput palace (दा. क्र. ६५३८)

३) Some Blunders of Indian Historical Resarch (दा. क्र. ६८११)

४) Tajmahal is a hindu palace (दा. क्र. ८०८८)

५) Lucknow`s Imambara`s are Hindu palaces (दा. क्र. ८३१८)

६) वैदिक विश्वराष्ट्र का इतिहास (दा. क्र, १०६२१)

७) Greet Britain was Hindu Land (दा. क्र. १०९३९)

८) हिंदुस्थानचे दुसरे स्वातंत्र्ययुध्द (दा. क्र. १११७१)

९) Delhi`s Red fort is Hindu Lalkot (दा. क्र. ११५७२)

१०) ताजमहल, नव्हे तेजोमहालय - शिवमंदिर (दा. क्र. १४४९५)

११) इस्लामी परचक्राची सुरुवात (दा. क्र. १७००९)

१२) Indian Kshatriyas once rules for Bali to Baltic & korce to kaba ( दा. क्र. १८५८८)

१) संदर्भ : संक्षिप्त मराठी वाङमयकोश १९२० ते २००३

प्रकाशक जी. आर. भटकळ फाउंडेशन मुंबई

**श्री विश्वनाथ शेंड्ये,**

ठाणे


दि
शा
नियमित
वाचा.

*आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.*


**प्राच्यविद्या अभ्यास संस्था**
**संदर्भ ग्रंथालयाचा पत्ता**

शाहू मार्केट, पहिला माळा,
नौपाडा पोलीस स्टेशन समोर,
नौपाडा, ठाणे ४०० ६०२

काम केल्याचा देखावा करणारी माणसं जगाला फसवत राहतात. - *जॉन स्मिथ*

# मकरसंक्रात

*यंदा संक्रात १५ तारखेस आहे. या सणाबद्दलची माहीती देणारा हा लेख*

दिवाळीचा सर्वांचा आवडता सण अत्यंत उत्साहात साजरा केल्यानंतर, आपल्याला काही दिवसातच गोड गुलाबी थंडीची चाहूल लागते व अत्यंत उत्साहपूर्ण असे हवामान असतांना सर्वांना एकत्र आणणारा मकर संक्रात हा पौष महिन्यातील महत्त्वाचा सण येतो. दरवर्षी १४ जानेवारीला सूर्य मकरराशीत प्रवेश करतो म्हणून याच दिवशी आपण मकरसंक्रातीचा सण साजरा करतो. याविषयी पौराणिक कथा अशी आहे की, संकरासूर नावाचा राक्षस लोकांना फार उपद्रव देई. यावेळी देवीने संक्रतीचे रूप घेतले व त्या संकरासूराला ठार मारून लोकांना सुखी केले. पौराणिक काळापासूनही दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांपासून सत्प्रवृत्त लोकांचा छळ होण्याची परंपरा चालूच आहे. परंतु काही काळानंतर सत्प्रवृतीचाच नेहमी विजय होतो हे सध्याच्या परिस्थितीतल्या काही घटनांवरून आपल्या प्रत्ययास येते.

आपल्या सर्वच सणांची पार्श्वभूमी ही त्या त्या ऋतुंतील हवामानाच्या बदलामुळे होणाऱ्या परिणामाशी निगडित असून आपण बदलत्या ऋतुमानाशी जुळवून घेऊन जास्तीत जास्त आरोग्य संपन्न कसे राहू हा महत्त्वाचा दृष्टिकोन यामागे आहे. यामुळे आपल्या पूर्वजांच्या परंपरेचे व दूरदृष्टीचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. कारण १४ जानेवारीला म्हणजे संक्रातीच्या दिवसापासून सूर्य

मकरराशीत प्रवेश करतो याला मकरसंक्रमण असे म्हणतात. मकर संक्रातीच्या आदल्या दिवशीच्या भोगी या सणाला सूर्योदयाच्या वेळी गरमागरम मुगाच्या डाळीची खिचडी, भरल्या वांग्याची भाजी, तीळ लावलेली बाजरीची भाकरी असा बेत असतो. या सर्व उष्ण व शक्तिवर्धक पदार्थांमुळे आपल्या शरिराला कडक थंडीशी सामना करण्याची शक्ती येते. तीळ वापरण्यातला दुसरा अर्थ स्निग्धता म्हणजेच स्नेह, मैत्री. तीळाचे गुळाशी मिश्रण केल्याने स्नेहाची गोडी अधिक वाढावी असा हेतू तिळगूळ घ्या, गोड बोला या प्रथेमागे आहे. असलेले स्नेहसंबध वाढावेत, नवीन संबंध जुळून यावेत, दुरावलेले संबंध जुळावेत हा एक उदात्त असा सामाजिक दृष्टिकोन यामागे आहे. तसेच या दिवशी नूतन वधूवरांचा संक्रतीसण साजरा करतात. यावेळी त्या मुलीला काळी खडीची सुंदर साडी देऊन त्यावर पांढऱ्याशुभ्र हलव्याचे उठून दिसणारे दागिने घालण्याची प्रथा आहे. साडीचा काळा रंग घेण्याचे कारण काळा रंग हा जास्त उष्णता शोषून घेणारा रंग असल्यामुळे थंडीपासून सरंक्षण मिळते. तसेच काळ्या साडीवर हलव्याचे पांढरेशुभ्र दागिने खूलून दिसतातच. पण त्यामुळे स्त्रियांच्या अंगी असलेल्या कलाकुसरीला योग्य वाव मिळतो.

या दिवशी स्त्रियांना सुगडाचे वाण देण्याची प्रथा आहे. हा सुभट शब्दाचा अपभ्रंश आहे हे पृथ्वीला दान आहे. त्या सुगडामध्ये बोरे, गाजरे, ऊस घालून त्या त्या वस्तूचे आरोग्यविषयक महत्त्व जाणवून दिले आहे. मकरसंक्रातीच्या हळदीकूंकू करण्याच्या प्रथेमागे गोरगरीबांना दान देण्याच्या प्रवृत्तीचा विचार असतो. तसेच सर्व स्त्रियांच्या या निमित्ताने एकत्र येण्याने परस्पर परिचय होऊन विचारांची देवाण घेवाण होते व त्यामुळे सामाजिक जाणीवांचा प्रत्यय येतो.

**सौ. मालती देवधर**
प्रशांतनगर, नौपाडा, ठाणे(प.)
दूरध्वनी २५४०३४६.

एखादे सोपे काम पुढे ढकलले की ते अवघड होऊन बसते. - *डॉ. राधाकृष्णन*

## प्रकरण तिसरे

# अरुणाचलम् येथील रमण महर्षी

*आत्मशोधावर भर असणारे व भूतदयेने अंतःकरण पिघळणारे रमणमहर्षी. त्यांच्या जीवनापासून खूप शिकता येण्यासारखे आहे. - संपादक*

### स्वामी स्थलांतर करीत राहिले

मातोश्री गेल्यापासून स्वामी सतत स्थलांतर करीत राहिले. एका गुहेतुन दुसऱ्या गुहेत आंब्याच्या झाडाच्या गुहे नंतर विरूपाक्ष गुहेत. काही लोकानी याचाही फायदा उठविला. त्यांच्या प्रसिद्धीची गोष्ट लक्षात घेऊन दर्शनासाठी तिकीट लावून पैसे उकळण्यास सुरुवात केली. स्वामींना हे कळताच ती जागा सर्वतोपरी राळली व ते दुसऱ्या गुहेत जाऊन राहिले. या कृत्याचा त्या व्यक्तीला पश्चाताप झाला. त्यानी स्वामींची मनधरणी केली, तेव्हा स्वामी परत त्या जागेत आले.

विरूपाक्ष गुहेत फार गरम होत असल्याने स्वामी मुलाईपाळ तीर्थाजवळच्या आमराईतील गुहेत राहू लागले. या गुहेत अक्षरमणी मालै हे स्तोत्र स्वामींना स्फुरले. या त्यांच्या काव्यात माधुर्य, भक्तिरस, आध्यात्मिकता या गोष्टी विशेष आहेत. स्वामींच्या जवळ राहाणारे लोक हे काव्य गायन करीत. याच सुमारास काही सुशिक्षित मंडळींचे लक्ष स्वामींकडे आकर्षित झाले.

### संवाद टिपणी करण्यास सुरुवात -

गभीरम् शेषय्या यांनी स्वामीजींना भेटावयास येत असलेल्या भक्तजनांना देत असलेली स्वामीजींची उत्तरे संग्रहित केली व या संग्रहावरून त्यांच्या विचार संग्रहाचा मजकूर तयार केला. तसेच रित प्रकाशं पिल्ले यांनी स्वामींशी आपले संबंध कसे होते हे अनुग्रह अहवाल यामध्ये लिहिले. त्यामधील अल्पसा भाग - मी कोण आहे ? हा प्रश्न स्वत:ला सतत विचारला व चिंतन केले तर तुला तुझ्या बद्दलची सत्यस्थिती कळेल व त्यामुळे मोक्ष मिळेल. मी म्हणजे पंचेन्द्रिय नव्हे, विषयवस्तू नव्हे, कर्मेन्द्रिय नव्हे, तसेच प्राण वा मन नव्हे, गाढ झोपेची अवस्था नव्हे. वरीलपैकी प्रत्येक गोष्टी वगळल्यावर जे काही शिल्लक राहाते, तो मी आणि तीच अंतिम जाणीव. ज्या लाकडाने प्रेताला अग्नी दिला जातो त्या लाकडाचीही शवाबरोबर राख होते. त्या प्रमाणे मी कोण आहे याचा तपास करता करताच मनाची सर्व कार्ये व त्याबरोबर मनही नाश पावते. यानंतर आपल्याला मी चे ज्ञान आपोआप होते.

### काव्यकंठ गणपति शास्त्री -

स्वामींचा अनुग्रह प्राप्त करून घेणारी एक महत्त्वाची व्यक्ती म्हणजे काव्यकंठ गणपति शास्त्री होत. कवी आणि विद्वान म्हणून ते प्रसिद्ध होते. त्यांनी बारा वर्षे तप केले. परंतु त्यांना अनुभूती प्राप्त झाली नाही. एकदा १९०७ साली एका मठात ध्यानस्थ बसले असताना देवाला तुम्ही पाहिजे आहात असा आवाज त्यांना ऐकू आला. ते तडक मंदिरा कडे निघाले. त्या वेळी मिरवणूक येत होती. त्यानी दंडवत घातले. त्यांना का बोलावण्यात आले याचा उलगडा झाला नाही. ते तसेच रस्त्यातून येर झारा घालत राहिले. दुसऱ्या दिवसाच्या मध्यान्ह काळा पर्यंत असे ते येर झारा घालीत राहिले. एकदम त्यांना टेकडीवरील स्वामींची आठवण झाली. ते भर उन्हात टेकडी चढून वर गेले. स्वामी विरूपाक्ष गुहेच्या ओटीवर बसले होते. स्वामींच्या पायावर लोटांगण घातले व विनवणी करून म्हणाले - स्वामी जे वाचावयाचे आहे ते सारे वाचले. शास्त्र समजून घेतले. खूप तप केले

तरी तप म्हणजे काय हे मला समजले नाही म्हणून मी आपल्या चरणपाशी आलो आहे.

स्वामी त्यांच्याकडे काही काळ एक टक पाहात राहिले. मग मौन सोडून तामीळ मध्ये बोलू लागले. स्वामी म्हणाले -'मी हे तत्त्व जेव्हा उत्स्फूर्तपणे प्रगट होते त्या वेळी त्याचे निरीक्षण केले तर मन त्यात तल्लीन होते. ही तल्लीनता म्हणजे खरे तप. जेव्हा एखादा मंत्र वारंवार जपला जातो तेव्हा मंत्र ध्वनी कोठून प्रकट होतो त्या उगम स्थानावर आपले लक्ष केन्द्रित केले तर मन त्यात पूर्णत: गढून जाते हेच खरे तप'. या वचनाने काव्यकंडांचे पूर्ण समाधान झाले. ती दुपार तिथेच घालवली.

त्यांना स्वामींबद्दल पूर्ण खात्री पटली. तेथे उपस्थित असलेल्या लोकांना उद्देशून ते म्हणाले, स्वामींचे खरे नाव व्यंकटरमण महर्षी. मात्र सर्व भक्तांनी या पुढे त्याना भगवान असे म्हणावे. ही गोष्ट लोकांना अतिशय आवडल्याने त्यानी ताबडतोब त्यांचे म्हणणे स्वीकारले. त्या वेळी काव्यकंठा बरोबर त्याचे स्वत:चे अनुयायी होतेच. त्यामुळे साहजिकच स्वामींना भेटून प्रश्न विचारणाऱ्यांची संख्या वाढू लागली. या पैकी अति महत्त्वाचे संवाद श्रीकंठानी लिहून ठेविले व मागाहून ते रमण गीता या नावाने काव्यरूपात प्रसिद्ध ही केले. स्वामींशी त्यांचे वैशिष्ट्य पूर्ण संबंध होते. या घटने नंतर तब्बल एकवीस वर्षानी एक म्हणजे १९२९ साली स्वामीनी श्री कंठांच्या एका अनुभवाला पुष्टी दिली. तो स्वामींचा अनुभव असा - काही वर्षापूर्वी एक दिवस मी आडवा झालो होतो. मी समाधानी नव्हतो. मला माझे शरीर वरवर उचलले जात आहे असे वाटले. आसपासच्या सर्व वस्तू दिसेनाशा होईपर्यंत असे टाळले. माझे भोवती स्वच्छ प्रकाश दिसू लागला. नंतर शरीर अचानक खाली आले व सर्व वस्तू पुन: दिसू लागल्या. मी स्वत:शी म्हटले अखेरीस सिद्ध व्यक्ती अशाच दृश्य व अदृश्य होतात. मला कल्पना आली मी विखोदुयुर येथे होतो. मी ज्या रस्त्याने गेलो, त्या रस्त्याच्या एका बाजूला एक गणपति मंदिर होते. मी आत गेलो. मी तिथे काय केले व काय म्हटले आठवत नाही. एकाएकी मला जाग आली. मी विरूपाक्ष गुहेत झोपलो आहे हे आढळले. १९०८ साली काव्यकंठ जेथे राहात होते त्या मंदिराला हे वर्णन बरोबर लागू पडत होते. तप करताना त्यांना काही अडचण आली व आपल्या मार्गदर्शनासाठी महर्षी येथे असावयास हवे होते असे वाटताच महर्षी आत येत असल्याचे दिसले. त्यांनी महर्षींना वंदन केले. महर्षींनी आपला हात त्यांच्या डोक्यावर ठेवला. त्या बरोबर विजेचा धक्का बसल्याचा अनुभव आला. काव्य कंठांनी ही हस्तदीक्षा मानली. ते वस्थेवर तिरूदनमलाईला येऊ लागले. १९२२ ते १९२९ पर्यंत त्यांनी दीर्घ मुक्काम केला. त्यांचा मुक्काम आमराईतल्या गुहेत होता. काव्यकंठ थोर विद्वान, हुशार, अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे आणि विचारवंत होते. तसेच ते टीकाकारही होते. त्यांची महर्षींवर निरतिशय भक्ती होती. गुरूच्या कृपेसाठी आपली सारी क्षमता पणाला लावली. त्यांना योग सामर्थ्याचा विशेष अनुभव होता. या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची जीवनयात्रा खरगपूर (कलकत्ता) येथे निमपुश आश्रमात २५ जुलै १९३६ साली संपली.

**रामस्वामी अय्यर**

हे पी. डब्ल्यू. डी. मध्ये ओव्हरसिअर होते. स्वामींच्या दुसऱ्या भेटीत त्यांची खळबळ उडाली. त्याने स्वामीना दंडवत करून विनवणी केली. पापी लोकाना पापमुक्त करण्यासाठी जीसस् आणि इतर महात्मे जगात अवतरले. मी अशी काही आशा धरू नये का? स्वामी उत्तरले होय. आशा आहे. राम स्वामींनी आपल्या दैनंदिनीत काही नोंदी केल्या होत्या. त्यावरून कळले की - मला अन्न पचत नसे. मला नीट झोप लागत नसे. मी नेहमी काळजीत होतो. स्वामींना मी माझ्या प्रकृतीबद्दल सांगितले. सांगत असताना माझे डोके गरम झाले होते. सांगितल्यानंतर

संभाषण करताना, ज्याचा मागून पश्चात्ताप करावा लागेल, असा एक शब्दही उच्चारता कामा नये. - *महमंद पैगंबर*

काही क्षणातच ते थंड झाले. तो दिवस सौम्यवर्षा आधीचा अठरावा दिवस होता. एका बाईने काही पकवान्न आणले होते. मी केवळ कांजी घेत असे. स्वामींनी आग्रह पूर्वक सांगितल्यामुळे मी पक्वान्न भरपूर खाल्ले. त्या रात्री मला छान झोप लागली. मी औषधावर अमाप पैसा खर्च केला होता.

**एचमाळ बाई -**

ही बाई रमणाश्रमात राहावयास आली. पती आणि दोन मुले लागोपाठ वारल्याने अतिशय हृदयद्रावक मनस्थितीत ही बाई जीवन कंठत होती. ही बाई गोकर्ण येथे यात्रेला गेली. अनेक साधूना भेटली पण तिचे दु:ख हलके होईना. महर्षीचे नांव ऐकून ही तिरूवन मलाई येथे आली. त्यावेळी महर्षी मौनात होते. ती शांतपणे त्यांच्या समोर बसून राहिली. या शांततेने तिच्या मनात क्रान्ती झाली. ती त्या जागी खिळून बसली. संध्याकाळ समयी कसेबसे ती त्या जागेवरून उठली आणि मैत्रिणीना तिने सांगितले - महर्षींच्या दर्शनाने तिचे दु:ख नाहीसे झाले.

एचमाळ बाई आपला मुक्काम तिरूवनमलाई येथे कायम केला. तीस वर्षे तेथे ती राहिली. स्वामींना भोजन दिल्याशिवाय ती अन्न ग्रहण करीत नसे. तिने आपला सर्व पैसा त्यांच्या सेवेत खर्च केला. तिचे घर म्हणजे भक्त मंडळीना एक विश्रांतीचे स्थानच झाले होते. तिने ध्यान धारणा करत आध्यात्मात बरीच प्रगती केली.

**स्वामी व इतर साधू -**

इतर साधूंना महर्षीबद्दल असूया वाटत होती. ते त्यांच्याशी शत्रुत्वाची भावना प्रगट करीत. एकाने तर स्वामींच्या अंगावर टेकडी वरून दगड घरंगळत सोडला. त्यावेळी स्वामी उतारावर एकटेच बसले होते. दुसऱ्याने मोठा दगड टाकला. तो महर्षी जवळ थांबला. महर्षी जागचे हलले नाहीत. एकाने तर कमाल केली. महर्षी हे आपले शिष्य आहेत असे भासविले. स्वामी सतत मौनात जात असल्याने हा डाव त्याना साधता आला. तो साधू महर्षीशी उद्धट पणे वागू लागला. हे भक्ताना कळले तेव्हा त्यांनी त्या साधूचा पाठलाग करून त्याला पळवून लाविले.

**पहिले परदेशी भक्त**

एक युरोपीय गृहस्थ सर्वप्रथम महर्षींकडे आकर्षित झाले. त्यांचे नाव एफ्. एफ्. हम्फ्रेज असे होते. हे १९५१ साली पोलीस अधीक्षक होते. हे बरेच धार्मिक वृत्तीचे होते. पूर्व जन्मात आपण एखाद्या सिद्धांताच्या समूहात होतो की काय अशी त्यांची समजूत होती. ते तीन वेळा महर्षींना भेटले. स्वामी बरोबर झालेल्या संभाषणांचा वृत्तान्त त्यानी इग्लंड मधील आपल्या एका मित्राकडे पाठविला. त्याने तो आंतरराष्टीय मानसशास्त्रीय गॅझेट येथे प्रसिद्ध केला. काही काळाने हम्फ्रेजने नोकरीचा राजीनामा देऊन रोमन कॅथालिक साधू म्हणून जीवन कंठले. महर्षींबरोबर झालेल्या संभाषणातील काही भाग असा होता.

श्री हम्फ्रेज - स्वामी मी जगाला मदत करू शकतो का?

स्वामी - स्वत:लाच मदत करा म्हणजे तुम्ही जगाला मदत करू शकाल.

श्री हम्फ्रेज - मी जगाला मदत करू इच्छितो. मी मदतगार होऊ शकणार नाही काय ?

स्वामी - स्वत:ला मदत करतानाच तुम्ही जगाला मदत करत असता. तुम्ही जगात आहात म्हणजे तुम्ही जग आहात, तुम्ही जगापेक्षा निराळे नाहीत किंवा जगही तुमच्या पेक्षा निराळे नाही.

श्री हम्फ्रेज - स्वामी, श्रीकृष्ण व जीझस यांनी अद्‌भूत चमत्कार केले. तसे चमत्कार मला करता येतील काय ?

स्वामी - जेव्हा ते तसे करत असत त्या वेळेस त्यांच्या पैकी कोणीही आपण काही करत आहोत किंवा निसर्ग नियमा

विरूध्द काही करत आहोत याचा विचार केला काय?

श्री हम्फ्रेज - नाही.

स्वामींनी नंतर पटवून दिले की असे अद्‌भूत चमत्कार करण्याच्या मागे जाऊ नये. त्यापेक्षा स्वत:ला शरण जाऊन उच्च स्थितीत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यासाठी स्वत:ला पुढे न्यावे.

**महर्षी संबंधित वाङमय -**

सर्व प्रथम लिहिले गेलेले त्यांचे चरित्र श्री नरसिंहस्वामी यांच्या लेखणीतून उतरले. ते एक निर्भय आणि परिश्रम घेणारे राजकारणी व्यक्ती म्हणून प्रसिद्ध होते. श्री. बी. व्ही.नरसिंह अय्यर हे कित्येक वर्षे मद्रास लेजिस्लेटिव्ह काउन्सिलचे सभासद होते. त्यांच्या कुटुंबातील दु:खद प्रसंगानंतर ते निवृत्त झाले आणि रमणाश्रम गुहेत राहू लागले. त्यांच्या आत्म साक्षात्कार या पुस्तकाच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. या पुस्तकातून बाह्य जगाला महर्षी बरोबरीचे संवाद ही पुस्तके श्री टी.व्ही. कपाली शास्त्री यानी लिहिली. नंतर ते अरविंद आश्रमात राहावयास गेले. सत् दर्शन हे पुस्तक संस्कृत मधे लिहिले होते. त्याचा इंग्रजीत अनुवाद देखील त्यांनीच केला. ते काव्यकंड गणपति शास्त्री यांचे चाहते होते. ते अगदी लहानपणीच महर्षींच्या प्रभावा खाली आले. त्यांचा प्रदीर्घ सहवास व महर्षींची सखोल शिकवण आणि व्यक्तिगत ज्ञान या साऱ्या गोष्टींचे ठसे या पुस्तकात ठळकपणे उमटलेले आढळतात.

शुध्दानंद भारती याने रमण विजयम् नावाने तामिळ भाषेत विस्तृत चरित्र लिहिले. नंतर तेलगु व इतर भारतीय भाषांतही त्यांची संस्करणे निघाली.

पॉल ब्रन्टन यांनी सर्च इन सीक्रेट इंडिया यात महर्षी बद्दल सर्व माहिति दिली आहे. नंतरची त्यांची दोन पुस्तके दि सीक्रेट पाथ आणि मे सेज फ्रॉम अरूणाचलम् ही होत. या पुस्तकांमुळे आश्रमात परदेशी दर्शनार्थींची सतत रीघ लागली. पॉल ब्रन्टन काही महिने तिरूवनमलाई येथे राहिले. त्यांनी आपला बहुतेक वेळ आश्रमात घालविला.

**राजकारणी लोकांची आश्रम भेट-**

डॉ. राजेन्द्र प्रसाद - हिंदुस्थानचे पहिले राष्ट्रपती, डॉ. एस्. राधाकृष्णन् हे दुसरे राष्ट्रपती, डॉ. सी. पी. राम स्वामी अय्यर, श्री जमनालाल बजाज व इतर अनेक आठवडाभर आश्रमात राहिले होते. त्यानी स्वामीना प्रश्न विचारला स्वराज्याची इच्छा योग्य आहे काय? स्वामी म्हणाले -होय आपल्या ध्येयासाठी प्रत्यक्षात दीर्घकाळ केलेले काम हळू हळू दृष्टिकोन विशाल करते. त्यामुळे ती व्यक्ती मातृभूमीशी एकरूप होते असे एक रूपत्व इष्ट असते. त्यामुळे कर्म हे निष्काम होत जाते. कर्म करत असताना त्यांनी उच्चतम शक्तीला शरण जावयास हवे. त्या शक्तीची जाणीव ठेवून तिला कधीही नजरेआड होऊ देऊ नये असे झाले तर, तो अहंकारी कसा होईल? त्याने कर्माच्या फळाची अपेक्षा ठेवू नये तेव्हाच ते निष्काम कर्म होईल.

जाता जाता राजेंद्र प्रसादांनी फक्त एकच प्रश्न विचारला. महात्माजीनी मला येथे पाठविले आहे. त्यांच्याकडे घेऊन जाण्यासारखा काही संदेश आहे का? स्वामी म्हणाले - जेव्हा हृदयाशी हृदय बोलते तेव्हा निराळ्या संदेशाची काय आवश्यकता आहे? जी शक्ती येथे काम करत आहे तीच तेथेही कार्य करीत आहे.

**श्री. शं. बा. मठ**

कुमार अशिष, राम मारुती रोड,
ठाणे ४०० ६०१.

# कुनमिंगची पश्चिम टेकडीः भाविकांचे भक्तिस्थान

*चीनच्या भेटीत कुनमिंग जवळच्या टेकडीतील मंदिर दर्शनाचा हा अनुभव. ऐतिहासिक महत्त्व असणारे हे स्थान आहे. - संपादक*

कुनमिंग हे चीनच्या युन्नान प्रांताच्या राजधानीचे शहर. या शहरात अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत. पश्चिम टेकडी हे त्यातले महत्त्वाचे स्थळ. शहराच्या पश्चिमेला साधारणपणे १५ किलोमिटरवर ही टेकडी आहे. डियान्ची तलावाच्या पश्चिम किनाऱ्यावर असलेल्या या टेकडीची लांबी सुमारे ४० किलोमीटर एवढी आहे. दुरून पाहिले तर असे वाटते की एखादी सुंदर स्त्री उताणी झोपली असून तिचे मोकळे केस तलावात तरळत आहेत. या स्त्रीच्या शरीरातील तिचा चेहरा, वक्षस्थळ आणि पाय या सर्वांची एक रेखाकृती आपल्याला दिसते. म्हणून या टेकडीला निद्रिस्त सुंदर टेकडी (Sleeping Beauty Hills) असेही म्हणतात.

चीनमध्ये दरवर्षी किशोरवयीन मुलांसाठी नवनिर्मिती स्पर्धा आयोजित केली जाते. या मालिकेतील २२ वी स्पर्धा कुनमिंग या शहरात १ ते ४ ऑगस्ट या कालावधीत आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी कुनमिंगला जाण्याचा योग आला. स्पर्धेच्या कामातून वेळ काढून आंतरराष्ट्रीय पाहुण्यांसाठी प्रेक्षणीय स्थळांना भेटी आयोजित करण्यात येत असत. त्यांतील एक भेट पश्चिम टेकडीला आयोजित करण्यात आली होती. आमचे हॉटेल शहराच्या पूर्वेला होते आणि आम्हाला शहराच्या पश्चिमेला जायचे होते. याचा अर्थ संपूर्ण शहर पार करावयाचे होते. परंतु या प्रकारात आम्हाला कुठेही अडथळा आला नाही. हॉटेलपासून थोडे अंतर आल्यावर आमची बस एका उड्डाणपुलावर चढली. हा उड्डाणपूल मैलोगणती लांब आहे. उड्डाणपुलाच्या खाली ४ लेनचा रस्ता आणि पुलावर ६ लेनचा रस्ता अशी व्यवस्था आहे. आम्हांला टेकडीकडे वळायचे होते म्हणून आमच्या चालकाला उड्डाणपुलावरून बस खाली घ्यायला लागली. आम्ही साधारणपणे २५ किलोमीटरचा प्रवास उड्डाणपुलावरून केला. त्यापुढेही उड्डाणपुल मैलोगणती असल्याचे स्पष्ट दिसत होते. उड्डाणपूलावरून खाली येताच आम्ही टेकडीवर चढू लागलो. टेकडीवर जाणारा रस्ता जरा अरूंद आणि वळणावळणाचा आहे. पुढून वाहन आले की अडचण होत. परंतु या अडचणीवर मात करीत आम्ही टेकडीवर पोहोचलो.



**शहरातील दुमजली रस्ते**

टेकडीवर मंदीरांची मालिकाच आहे. बस जेथे थांबते तेथून मंदीराच्या प्रवेशद्वारापर्यंत जाण्यासाठी उघड्या वाहनांची व्यवस्था केलेली आहे. परंतु बरेच पर्यटक पायी जाणेच पसंत करतात. कारण रस्ता चांगला असून दोन्ही बाजूला गर्द झाडी आहे. आपण चालत जातो तेव्हा टेकडीच्या कडेकडेने चालत असतो. डाव्या बाजूला डियान्ची तलाव आणि उजव्या बाजूला डोंगराची उंच कडा

असे दृश्य पाहायला मिळते. तलावाच्या किनाऱ्यावर एक रस्ता असून रस्त्याच्या कडेला घरे आहेत. तलाव, रस्ता, घरे हे दृश्य खूपच मोहक दिसते. पर्यटक मध्ये मध्ये थांबून या दृश्यांची छायाचित्रे घेत असतात. साधारणपणे अर्धा तास चालल्यानंतर आपण मुख्य प्रवेशद्वाराजवळ पोहोचतो. मंदिर परिसरात जाण्यासाठी ३० युहानचे तिकीट काढावे लागते.



**टेकडीवरून दिसणारे तलावाच्या किनाऱ्याचे दृश्य**

मुख्य प्रवेशद्वारातून आत जाताच आपल्याला पुढे एक मंदिर दिसते. मंदिर छोटेच आहे. त्यात बुद्धाची मूर्ती आहे. परंतु गर्दी होते ती शेजारी उघड्यावर असलेल्या मूर्तीजवळ. या मूर्तीचे तोंड वाघाच्या तोंडासारखे आहे. हा पुतळा समृद्ध देवतेचा आहे अशी आख्यायिका आहे. या पुतळ्याच्या तोंडात हात घालून पटकन तो हात आपल्या खिशात घातल्यास लवकरच मोठी संपत्ती मिळते अशी कल्पना आहे. येणारे सर्वच पर्यटक आपले नशीब आजमावयचा प्रयत्न करतात. असे करण्याने खरोखरच संपत्ती मिळते की नाही याबद्दल काहीच माहिती नाही.

पुढचे मंदिर पाहण्यासाठी अनेक पायऱ्या चढून जावे लागते. तेथेदेखील बुध्दाची मूर्ती आहे. आपल्या इच्छा पूर्ण करणारे देवस्थान अशी या मंदिराची प्रसिध्दी आहे. येथे येऊन मनोभावे प्रार्थना करून देवाकडे मागणी केली की आपली मनोकामना पूर्ण होते असे सांगितले जाते. प्रत्येकाची काही ना काही इच्छा अपूर्ण असतेच. एखादे काम हाती घेतले असेल तर त्यात यश मिळेल की नाही याची भीती मनात असतेच. अशी सगळी मंडळी आपली इच्छा पूर्ण व्हावी यासाठी देवाकडे साकडे घालतात.



**टेकडीवरील मंदिरात असलेली बुध्दाची मुर्ती**

टेकडीच्या वरच्या टोकाला असणारे मंदीर दीर्घायुष्य प्रदान करणारे मंदिर म्हणून ओळखले जाते. हे मंदीर तलावाच्या पाण्याच्या पातळीपासून साधारणपणे १००० फूट उंचीवर आहे. मंदिराच्या पुढच्या भागात क्षणभर उभे राहता येईल अशी व्यवस्था केलेली आहे. कठड्यांचा आधार घेऊन खालचे दृश्य पाहणे हा खरोखरच आनंददायी अनुभव आहे. या मंदीरापर्यंत पोहोचणे मात्र जिकीरीचे काम आहे. अतिशय अरूंद पायवाटेने एकेक पायरी चढत मंदिरापर्यंत पोहोचावे लागते. एका वेळेस एकच व्यक्ती या पायवाटेने जाऊ शकते. त्यामुळे वरून खाली उतरणाऱ्यांना आधी वाट द्यायची आणि नंतर आपण चढायचे असा इथे शिरस्ता आहे. दर्शन आटोपलेली मंडळी जोपर्यंत खाली येत नाहीत तोपर्यंत तिथे उभे राहायलादेखील जागा शिल्लक राहत नाही. मजल दरमजल करीत आपण जेव्हा या मंदिराजवळ पोहोचतो तेव्हा आपल्या परिश्रमाचे चीज झाल्याचे जाणवते.

मंदिरात बुध्दाची भव्य मूर्ती आहे. मंदीराच्या बाहेरच्या भागात उघड्यावर एक कासवाची मूर्ती असून या मूर्तीला सापाने विळखा घातला आहे. कासव आणि साप या द्वयींच्या मूर्तीला स्पर्श केल्यास दीर्घायुष्य लाभते असा विश्वास आहे. वैज्ञानिकदृष्ट्या विचार केला तरी असे लक्षात येते की हे दोन्ही प्राणी अनेक वर्षे जगतात. म्हणूनच त्यांचा प्रतिकासाठी उपयोग केला असावा.



**मंदिरापुढे असलेली कासवाची मुर्ती**

सगळ्यात उंचीवर असलेले मंदिर पाहून आपण परतीचा प्रवास सुरू करतो. वाटेत आपल्याला अनेक गोष्टी दिसतात. वरून पाहात असताना आपल्याला मंदीराच्या रचनेची कल्पना येते. बऱ्याच ठिकाणी बांबू आणि कौलांचा उपयोग केला आहे. सर्वच मंदिरे चांगली रंगविली असून आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवलेला आहे. याखेरीज आणखी एक गोष्ट आपले लक्ष वेधून घेते. ती म्हणजे तेथील वनस्पतींची विविधता. खडकाळ जागेवर अनेक प्रकारच्या वनस्पती वाढलेल्या आहेत. पाण्याच्या शोधासाठी त्यांची मुळे खडकात लांब जातात. काही ठिकाणी खडकावर पसरलेली मुळे आपल्याला दिसतात. याखेरीज झाडांच्या खोडावर लायकेन वनस्पतींचा एक चांगला हिरवा थर आपल्याला दिसतो. या थरांचे जरी आपण निरीक्षण करीत गेलो तरी त्यात वनस्पतीनुसार भिन्नता दिसते. समुद्रसपाटीपासून ६००० फूट उंचीवर असलेल्या या डोंगरात मात्र खडक आहेत ते गाळाचे. भूगर्भातील हालचालीमुळे समुद्राचा भाग वर उचलला गेल्याने ही टेकडी निर्माण झाली असावी. या टेकडीचा भक्तगणांनी चांगला उपयोग करून घेतलेला आहे. यातील हुयातिंग सी हे मंदिर नानझाव राज्याच्या राजवटीत ११ व्या शतकात तर ताइदुआ सी हे मंदीर युआन राजवटीत १२ व्या किंवा १३ व्या शतकात बांधलेले आहे. परकीय आक्रमणाने या मंदिराचे अनेकदा नुकसान झाले. परंतु प्रत्येकवेळा त्याची डागडुजी करण्यात आली. त्यामुळे टेकडी आणि त्याचा मंदीर परिसर अजुनही उत्तम स्थितीत आहे. या टेकडीवर जाण्यासाठी आता रोपवे देखील बनविलेला आहे. कुनमिंगला जाऊन पश्चिम टेकडीचे जर दर्शन घेतले नाही तर कुनमिंग पूर्णपणे पाहून झाले नाही असे म्हणतात ते खरेच आहे.



**वरून पाहताना मंदिराचा भाग असा दिसतो**

**डॉ. सुधाकर आगरकर**
४, अनिल को-ऑप. सोसायटी,
नगरपालिका प्राथमिक शाळेजवळ, काटेमनावली,
कल्याण (पूर्व)
दूरध्वनीः ९१-२५१-२३३२५२१
Email: s_agarkar@hotmail.com

# भारतीय संस्कृती- बीज, मॉडेल व साधना

*शुनःशेप आख्यानाचा संदर्भ घेऊन केलेले विवेचन हा लेखमालेतील पुढील लेख आहे. - संपादक*

**प्रास्ताविक :**

दिशाच्या डिसेंबर २००७ च्या अंकात मी 'यज्ञ' ह्या अत्यंत मूलगामी संकल्पनेचे गूढ उकलण्याचा प्रयत्न केला. का हा प्रयत्न करावा लागावा? कारण, वेद ह्या **''ईश्वर निश्चररीत''** ज्ञानाच्या खऱ्याखुऱ्या बोधज्ञानाच्या प्राप्तीसाठी 'यज्ञ' हया 'स्पिरिच्यूअल- आध्यात्मिक यज्ञाची' प्रक्रिया पूर्णपणे जाणण्याची आवश्यकता आहे. ह्या ज्ञानाच्या प्राप्तीमध्ये मुख्य अडथळा कोणा आहे? 'भौतिक यज्ञ' किंवा 'द्रव्ययज्ञ' ह्याचा जो पसारा व खटाटोप आपल्यासमोर केला जातो, तो खरा यज्ञ नसून तो 'आंतरिक आत्मयज्ञाचे' एका भौतिक पातळीवरचे प्रतीक आहे. कशासाठी हे प्रतीक? याचाच विचार ह्या लेखात करण्याचे योजिले आहे. या आत्मयज्ञात आपल्या शरीरामार्फत कुठच्या क्रिया होतात? आपल्या मनाच्या उत्क्रांत पातळीवर कुठच्या संकल्पना साकार होतात व शरीराकडून करविल्या जातात? या यज्ञात-अंतर्गत य-कृतींत आणखी कोणाची मदत होते. किंवा, आवाहन करून घडवून घ्यावी लागते? 'अग्नी' व त्याची स्वरूपे, आवाहन करणे, काय प्रकार आहे? 'देवता' ह्या शक्ती नेमक्या कोणत्या? त्यांची स्थाने कोणती? त्यांची पातळी भौतिक की, स्पिरीच्यूअल? त्यांना जागृत करण्यासाठी मंत्रशास्त्राची काय मदत? त्याची स्थाने कोणती? त्यांची पातळी भौतिक की स्पिरीच्यूअल? ब्रहीर्गहत-शरीराबाहे यज्ञकुंड, अग्नी, आज्य, हवि वगैरे वगैरे रचनांची प्रतीके व **'प्रतीकात्मक क्रिया'** या कुठच्या **'समांतर क्रिया'** देहांतर्गत कॉंशसनेसमध्ये करण्याची योजना (ईश्वराला) अभिप्रेत आहे. हे सर्व सांगण्याची माझी इच्छा असूनही केवळ सूत्र रूपानेच त्याचा निर्देश करावा लागेल आणि त्यामुळे वाचकाला, त्या सर्व संकल्पना स्वतःच्या कल्पनाशक्तिने जाणण्याचा प्रयत्न करावा लागेल, हे मला स्पष्ट दिसते आहे. तेव्हा, इथपासून पुढे हे सहकार्य अपेक्षित आहे!! महत्त्व एव्हढेच की हे प्रश्न सर्वांना पुन्हा नव्याने पहावेत व त्यांची पारंपरिक किंवा प्रचलित उत्तरे एखाद्या प्रचलित 'टयूशन क्लासच्या' सांप्रदायिक अभिनिवेशी यांत्रिक पद्धतीने देण्याऐवजी, आजच्या युगांत जो एकत्म (Integral) कॉंशसनेस व Integral Science एकात्म विज्ञान, संज्ञान, प्रज्ञान आज्ञन वगैरे मानवाला उपलब्ध झाला आहे, त्यांच्या मदतीने प्रत्येकाने शोधून बघावयाल हवी व खरी आध्यात्मिक उत्तरे व विनियोग शोधावयाला हवीत. हाच निखळ उद्देश आहे.

**संशय निवृत्ती**

वेद व त्यांतील ईश्वराने देऊ केलेले ज्ञान, समजणे कांआवश्यक आहे, त्याबद्दल प्रथम संशय निवृत्ती अत्यंत आवश्यक आहे. त्यांची कारणे व ती संशय स्वरूपे याबद्दल नंतर वळू या पण प्रथम त्यांचे काही समर्थन पुरावे व उद्देश बघू या!!

महाभारतात महर्षी-वेदव्यास काय म्हणतात पाहू या.

**अनादि निधनानित्या, वागुत्सुष्टा स्वयंम्भुवा**

**आदौ वेदमयी दिव्या, यतः सर्वा: प्रवृत्तयः**

**महाभारत १२-२३२-२४**

जगाच्या उत्त्पत्तीच्यावेळी स्वयंभू ईश्वराने वेद (सत्यज्ञान) प्रसृत केले, जे चिरंतन आणि दैवी आहेत. मनुष्य मात्राच्या सर्व जीवनव्यवहारासांठी मार्गदर्शक असा

ठेवा आहे.

याज्ञवल्क्य स्मृती काय सांगते?

**न वेदशास्त्रादन्यत् तु, किंचिच्छास्त्रं हि विघते।**
**निस्सृतं सर्वशास्त्रं तु, वेदशास्त्रात् सनातनात।।**

वेदांहून मोठे शास्त्र नाही. सर्व इतर शास्त्रे वेदांपासून प्रसृत होतात व वेदावरच आधारलेली असतात.

याला अधार किंवा पुरावा कोणता? हा प्रश्न तुम्हांला आजच्या **वेदप्रतिकूल श्रध्देमुळे** पडणारच. (लक्षात घ्या कीआपण आज पाश्चात्य भौतिक विज्ञानाच्या ज्ञानपध्दींवर विश्वास, श्रध्दा व जीवनाधार भिस्त ठेवलेले प्राणी आहोत) त्यामुळे खालील विधान वाचावयालाच हवे !!

**निजशक्त्याभिव्यक्ते स्वत: प्रामाण्यम्।**
**(सांख्यशास्त्र ५.५)**

वेद किंवा वेदज्ञान, आद्यज्ञान हे ईश्वारानेच आपल्याच स्वशक्तीने निर्माण केल्याकारणाने, त्या ज्ञानाच्या (सत्यतेचे) प्रमाण व पुरावा हादेखील त्यांतच अंतर्गत आहे. महर्षी पंतजली (योगशास्त्राचे गुरू) म्हणतात की, ह्या (सृष्टीला, मानवाला) सर्व तऱ्हेचे ज्ञान देणारा ईश्वरच सगळ्या ज्ञानपध्दती व प्रकारांचा आद्यगुरू, द्रष्टा आहे. हे सांगण्याचे मुख्य कारण हे कीं आपण ज्या मानवनिर्मित 'शास्त्रांना' व 'शास्त्रार्थींना' मानतो व त्यांच्या भौतिक व्यवहारातल्या कृतींना घडतना अनुभवतो त्यांनाच 'पूर्ण ज्ञानाचे सर्टीफि केट' बहाल करतो. पण, ही मानवबुध्दी निर्मित शास्त्रे तर असे सांगतात की, ही पूर्ण सत्य नव्हते त्यांतील चुक सुधारत, 'अपूर्णत्व ज्ञान' होत होत ती पूर्णत्वाकडे नेण्याचा आमचा यत्न आहे. ह्या तुलनेने वेद ज्ञानाचे वैशिष्ट्य हे आहे की ते मानवाला पूर्ण आकलन झाल्यास, 'पूर्ण ज्ञान' आहे व अनंत काळपर्यंत 'सत्य' रहाणा आहे. त्या सत्याच्या विश्वासावर श्रध्देवर रहाणे ह 'सनातन धर्म' आहे.

तेव्हा आता आपण परत आपल्या मूळ मुद्दकडे वळूं या.

**यज्ञ संकल्पना :**

'यज्ञ' ही संकल्पना व क्रियाही हे वेदज्ञान पूर्णपणे ह्या मानवी देहांतर्गत बुध्दी व चित्त अंत:करणाने जाणण्यासाठी आत्मसात करणे अत्यत आवश्यक आहे. म्हणूनच, ह्या जाणण्याच्या 'क्रिया' समजणे आवश्यक आहे.

कोण हे ज्ञान जाणू इच्छितो? हे गूढ ज्ञान जाणण्याची क्षमता, पात्रता व योग्यता कोणती? त्याच्या ज्ञानेंद्रियांच्या मर्यादा, पूर्वग्रह यंत्रणा कोणत्या? त्याच्या शारिरीक, मानसिक, बुध्दी, ह्दय यांच्या क्षमता व मर्यादा कोणत्या? हे प्रश्न प्रथम पहावयाला हवेत व त्यांची उत्तरे प्राप्त व्हावयाला हवी एव्हढे झाल्यावर मग ह्या अडचणींवर, मर्यादांवर मात करण्याचा संपूर्ण आराखडा व योजना ह्या भारतीय, हिंदू, वेदिक ज्ञानपद्धतींत सांगितल्या आहेत, थोड्या ज्या क्रीडा व साधने सांभाळल्या आहेत. त्यांच्या पाठपुरावा करणे आवश्यक आहे. फक्त अडचण सामाजिक, राजकीय पूर्वग्रहाची आहे. तसेच शुद्ध हेतूंचा अभाव असल्याची अडचण आहे.

दिशाच्या मागील प्रत्येक अंकात ह्याच मार्गावरील संकल्पना, साधना, वेदज्ञानातील दिशा, सांगण्ययाचा उपक्रम मी केला आहे. पण, त्या सगळ्यामागे ज्या 'यज्ञक्रिया' आहेत, त्या समजल्याखेरीज व त्याच्या भौगिक, तांत्रिक साधना केल्याखेरीज हे ईश्वरी ज्ञान खऱ्या अर्थाने समजणे अशक्य आहे. वेगवेगळे 'संप्रदाय' ही एक तऱ्हेची वेगवेगळी 'डिपार्टमेंटच' आहेत, पण ईश्वराचे जे मुख्य 'ऑरगनायझेशन' आहे ते या सगळ्या संप्रदायांचा एकत्रित उपयोग व त्या सांप्रदायिक ज्ञानाच्याही पलीकडील कित्येक अज्ञात संकल्पनेचा उपयोग करुन ह्या अपार ब्रह्मांडाचा पसारा, उद्योग व उद्दिष्टे साधणारी यंत्रणा आहे. Dynamic, Evalutionary a self-organised, self-

improvable evolutionary wisdom Dealisable ती अशी चीज आहे. संपूर्ण चेतनामय, उत्क्रांतत्त्वाची, स्वसयंभू, आत्मज्ञानी, सर्व ज्ञानी अशी चीज आहे त्या यंत्रणेचे आपले ज्ञान पध्दतीचे म्हणजे वेगळेपणाचे आहे- एकात्म नाही!!


**मानवी देह एक वैश्विक यज्ञकुंड** पण, अडचण आहे ती सीमित क्षमता असणाऱ्या मानवी फॉर्मची ! दैवी कृपेने एक मात्र उपकार असा आहे कीं, सतत जाणवणाऱ्या मर्यादांवर मात करण्यासाठी लागणारी शक्ती व यंत्रणा याच 'मानवी फॉर्म' मध्ये निद्रित अवस्थेत आहे ती म्हणजे 'यज्ञक्रिया' आत्मयज्ञाची क्रिया!! ह्या 'यज्ञक्रियेने प्रत्यक्ष जीवनात्म्याच्या' जन्मसिध्द पानवर मात व मुक्तताआणि स्वत:च्या आत्म्याची उन्नती करण्याची संपूर्ण 'यज्ञक्रिया यंत्रणा' अंतर्गत उपलब्ध आहे. ह्या यंत्रणेला आधार व पुरस्कार करणारी प्रकृती त्या पृथ्वीतलवर सिद्ध व 'आतूर' आहे. कारण ह्या समाष्टी व प्रकृतीतील प्रत्येक घटक हा सुध्दा मुमुक्षू आहे. पण, मानव हा ह्या साधकांचा समूहचा 'आध्यात्मिक नेता' आहे.

प्रश्नआहे तो ही यंत्रणा जाणण्याचा व ती यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी एक आगळा कठीण प्रयत्न सातत्याने व सामूहिक मदतीने युगायुगात शवण्याचा!!

हे सर्व ज्ञान जवळजवळ उपलब्ध आहे. ते जरा झाडून पुसून जाणावयाला हवे.बघूया काय आहे ते ज्ञान व जाणण्याच्या संकल्पना, योजना व कल्पना!!

Symbol spiritual mechanism प्रतीक हे त्यातले प्रमुख अंग!!

अतापर्यंत, मी 'प्रतीकांच्या' वापराबद्दल दिशाच्या मागील कित्येक अंकामधून मांडणी केलीच आहे. ह्या प्रतीकांची आवश्यकता का वाटते, त्याचा आमच्या विषयापुरता विचार करु या. अन्यथा जगाच्या या भौतिक




व्यस्त जगाची विशेषत: पृथ्वीवरील प्रकृती जो संबंध आहे. त्यात एका संवादाची व भाषेची आवश्यकता आहे. तशी ती निर्मात्यांनी पुरवली आहेत. पण मानवी फॉर्मला आवश्यकता जीवनव्यवहार व त्याच्या वैश्विक अस्तिवाच्या व्यवहारासंबंधी अत्यावश्यक आहे.


ह्या संबंधात काही पाश्चात्य विचारवंतदेखील ह्या नात्यांची, भाषेची आवश्यकता मानतात.

ही भाषा Symbol प्रतीक ह्या संकल्पनेतून शक्य झाली आहे.

Vladimir Dimitrov हे काय म्हणतात पाहू या, "Life starts with communication and ends when the ability to communicate ceases.

''जीवन हे संवादापासून सुरुवात करते व जेव्हा संवाद करण्याची क्षमता लोप पावते. तेव्हा संपते''. **ब्रदर निकोल ग्रेंच** म्हणतात - "The profane world communicate by words, whilst symbolism is the way the initiate communicate." निधर्मी भौतिकवादी जग शब्दांनी भाषेने संवाद करते, तर साधक हा प्रतीकांच्या माध्यमातून संवाद साधतो. हा संवाद व्यक्त व अव्यक्त जगांत साधणे हे जीवन रहस्य समजण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.

ह्या प्रश्नांचा अत्यंत खोलवर विचार आपल्या ऋषीमुनींनी, तांत्रिकांनी, योग्यांनी व इतर 'साक्षात्कारी ज्ञानाच्या साधकांनी' केला आहे. अशा तंत्रांची आवश्यकता पाश्चात्य विचारवंतांनाही पटली आहे. त्यांचे




संशोधन आपल्याला जवळचे आहे. कारण, आपणही त्यांच्याच भौतिक पातळीवर आहोत. आपले असले तरी आपल्या ऋषी, मुनींच्या पातळीवर आपण पोचलेलो नाहीत हे लक्षात ठेवावयाला हवे!!

पुन्हा एकदा Vladimir Dimitrov (व्हॅडिमिर डिमीटोव्ह) त्यांच्या Fuzzy Logic फझी लॉजिक ह्या संकल्पनेबाबत काय म्हणतात ते पाहू या. प्रथम ते म्हणतात की, ह्या अव्यक्त जगांत जी 'अनिश्चितता' भासते - 'अंधार' भासतो त्यांत मार्ग दिसण्यासाठी सिनर्जी म्हणजे गूढ शक्तीची आवश्यकता आहे. केवळ मानवनिर्मित भाषेच्या मार्फत हा संवाद अशक्य आहे. ह्या संवादामध्ये मानवाच्या बाजूला त्याचे विचार, भावना, अशा, अपेक्षा, जैविक निद्रित आकांक्षा, अव्यक्त इच्छा, जन्मजन्मातरीच्या उद्दिष्टांचा, ध्येयांचा समावेश असतो. ह्याच्या दुसऱ्या  बाजूला अव्यक्त जगांत ह्या विश्वाचे क जीवनाचे अनंत, अक्षर असे बीज सूत्र आहे.

ह्या दोघांमध्ये संवाद कसा साधणार? ह्याला सजनगती, कल्पनाशक्ती, साक्षात्कारी दर्शनाची आवश्यकता आहे. त्यांच्या शब्दातं ते म्हणतात.

"Without being supported by uncertainty, creativity withers without being supported by creativity, the comminication process becomes trivial and meaningless. creative communication is a complex dynamic process in which physical, emotional and mental characteristics of communication are inseparably tangled together.

A Natural Law which we calll the lan "lan of Emergence" is at the basis of the interaction in synergy with uncertainly.

The Law of Emergence is rooted in the chaotic (non-linear) dynamics of Complex systems".

In human system those subtle froces are perccivable as they are always embodied in some specific real 'vortices' (e.g. clash of ideas, views, attitudes, cultures, feelings) constantly arising in the flow of Energy of individual life". What needs to done is to decrease the volume of the 'noise' inside us."

''त्यांच्या म्हणण्याचा सारांश काय? 'या संवादाच्या' शक्यतेमध्ये अडचणी आहेत, अनिश्चितता आहे. त्यावर मात करण्यासाठी गूढ शक्तीचा उगम आणि उत्तुंग कल्पनाशक्तीचा वापर सृजन पद्धतीपणे आवश्यक आहे. त्यामुळे एका नैसर्गिक तत्त्वाचा कायदा जो 'लॉ ऑफ इमर्जन्स' म्हणतो येईल (एका उषा तत्त्वाची आवश्यकता आहे- एका कल्पनाशक्तीच्या साक्षात्कारी स्फोटाची आवश्यकता आहे. हे तत्व ह्याच अनियमित, अनियंत्रित गोधंळी अस्तित्वातच लपलेले आहे. ते नवीन गूढ शक्तीच्या उदयानंतर अर्थप्राप्ती व संवाद घडवून आणूं शकते.

मानवी व्यवहारात, जीवनांत अनेक तऱ्हेच्या विचारांची, कल्पना, संकल्पनांची वादळे व भोवरे असतात. कल्पनाचा विरोध संघर्ष, मतांचे विरुद्ध प्रवाह, वृत्तींचे व भावनांचे संघर्ष, संस्कृतीचे विरोध किंवा युध्देही असतात. हे प्रवाह मानवी व्यक्तींच्या मनांतून प्रगट होतात. व जीवनांत भोंवरे निर्माण करतात.

मग काय करावयाची आवश्यकता आहे? तर, ह्या गोधंळांचा आवाज कमी करावयाला हवा- आपल्या अंतर्मनात. कारण आपल्या बाहेरच्या आवाजांवर आपली सत्ता नसते. (थोडक्यात, मन एकाग्र व शांत करावयाला

हवे)

**भारतीय ज्ञानाची अवस्था**

डिमीट्रॉव्हे हे एक थोर रशियन विचारवंत आहेत. पण, त्यांच्या ह्या विचारांचा परिचय करुन देण्याचा उद्देश हाच आहे की ज्या रेषेपर्यंत पाश्चात्य संस्कृतीतील आधुनिक विचारवंत येतात, ती सीमा रेषा ज्ञात व्हावी. याच्या उलट भारतीय वेदिक ज्ञानात ह्या प्रश्नांची उत्तरे व साधना केव्हांच सांगून ठेवल्या आहेत. फक्त त्या सध्या निद्रिस्त सामाजिक अवस्थेत आहेत व त्यांची वर्णने सूत्र रूपाने न समजणाऱ्या किंवा न जाणवणाऱ्या शुष्क दिखाऊ कर्मकांडात अडकली आहेत.

**शुन:शेप ऋग्वेदातील आख्यान**

अशाच काही प्रमुख साधनांची त्यांच्या मूळ संकल्पानातील यज्ञकृतींची मांडणी आपण क्रमश: करणार आहोत. याची सुरूवात एका वेदिक आख्यानापासून करणार आहोत. कारण, 'आख्यान' म्हणजे एक Mythological metaphor असे 'पाश्चात्य वेद पंडितांनी' केल्यावर आपल्याकडच्या पंडित व विद्वानांनी सुध्दा त्याच चष्म्यातून त्यांच्याकडे पाहून त्यांतील स्पिरीच्यूअल सत्य प्रयत्न, सत्य उद्दिष्टे, गहन जीवन सत्य व त्याला साध्य करण्यासाठी लागणाऱ्या साधनाकडे अक्षम्य दुर्लक्ष केले हे लक्षात येईल!!

ही साधने यंत्रणा, त्यांच्या संकल्पना प्रत्यक्ष साधना व त्यांचा आध्यात्मिक स्तर आणि पातळी ह्या सगळ्या गोष्टी पूर्णपणे भारतीय आहेत, वेदिक आहेत. ह्या साधनांचा प्रभाव हिंदू संस्कृती, वाड मय, जीवनादर्श, रीतीरिवाज व समाजांच्या वैचारिक धारणांवर इतक्या खोलवर उमटलेला आहे, हे आजच्या कलियुगांत देखील दिसून येईल. भौतिकवाद व चंगळवाद यांचा मोठा अंमल भारताच्या सामाजिक जीवनावर दिसत असला तरी या आदर्शांचा ठसा भारतीय व्यक्तींच्या खोल अंतरंगात दिसून येईल. असे कां व्हावे याचा विचार केल्यास वेदिक वैश्विक सत्याच्या चिरंतन तत्वाचाच अंमल मान्य करावयाला लागेल. मानवी भौतिकवादी एकांगी विचारांच्या प्रभावातही ह्या धार्मिक, आध्यात्मिक आदर्शांची शोधाची छाया घनदाट असलेली आढळून येईल. ह्यातच मानवनिर्मित जीवन अर्थ व ईश्वर निर्मित जीवन आदर्श ह्यामधील तफावत दृष्टीस येईल.

हा कथाभाग आहे शुन:शेप आख्यानाचा. ऐतरेय ब्राह्मणकार असे म्हणतात ~~आहेत की~~

**''तदेत्परम् ऋक्शतगाथं शुन:शेपमाख्यानम्'**
**ऐ. ब्रा ७/१८**

ऋग्वेदांत १०७ ऋचा ह्या आख्यानांचा संदर्भ देतात.

| | |
|---|---|
| १/२४- ३० सूक्तांचे | ९७ मंत्र |
| ९/३ सूक्तांचे | १० मंत्र |
| | एकंदर १०७ मंत्र |

ऋग्वेद हे साक्षात्कारी पध्दतीचे दर्शन देतात अशी ख्याति आहे. मग, एखाद्या आख्यानावर एव्हढा भर कां?

आख्यान, संस्कृत शब्द मिथ, कथा पुराण, इतिहास कीं आध्यात्मिक दर्शन ह्यावर पुष्कळ विवाद व चर्चा झाली आहे.

आपल्याला जो विचार जास्त अर्थपूर्ण वाटेल, त्यावर आपण मांडणी करू या.

**आख्यान-साहित्य केवल कमोलकाचिन नही हैं, अपितु वह समाज की सभ्यता-संस्कृति इतिहास का दर्पण है । अपने युगकी साहित्यिक, सामाजिक, वैज्ञानिक, दार्शनिक, आयुर्वेदिक, ऐतिहासिक संपदाओंसे आपुरित होता है । कोई भी वास्तविक पुराणकथा (मिथ) अर्थहीन, हास्यास्पद या अश्लील**

**नही होती यह शुध्दतम रुप मे दार्शनिक होती है और वास्तविकता की आकस्मिक अंत:प्रेरणा की अत्यंत अभिन्नतम मौखिक अभिव्यक्ति होती है ।**

**आख्यानो में जड-चेतन और लौकिक-अलौकिक तत्वों का अद्‌भूत समन्वय है। उसी कारण उनकी शैली भी प्राय: रुपकमयी या प्रतिकात्मक होती है** शुन:शेय याचा अर्थ व्याकरणाच्या रोखाने साध्या सुत्राशी जोडला जाऊ शकतो.

**पण मग खालील अनेक ग्रंथात एवढ्या सामान्य विषयांचा संदर्भ का सांपडतो?**

**१) ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्ववेद**

**२) ब्रह्मपुराण, भागवत पुराण, देवी भागवत, विष्णु पुराण**

**३) मनुस्मृती**

**४) वाल्मिकी रामायण**

**५) ब्राह्मण ग्रंथ**

आपण समजूं शकतो कीं, कालांतरात मूळ गोष्टीमध्ये अनेक अर्थबदल, दृष्टिबद्दल, मनोवृत्तींतील बदल, तत्कालिक धार्मिक, तत्वज्ञानविषयक, सामाजिक, राजकीय बदल होत गेले असतीलच, काही गोष्टींची विकृत अवस्था होऊ शकेल व मूळ गोष्टीमध्ये प्रक्षित अर्थ पण घुसडण्यात आले असतील.

पण, जर आख्यान हे 'मूळ संकल्पनेचा' ''इतिहास'' असा दृष्टिकोन बाळगला, तर त्यातून 'गहू आणि तूस' किंवा 'हंस क्षीर' न्यायाने दूध व पाणी वेगळे करता येऊ शकेल. निश्चितच नाही कां?

ज्या कथेने फार मोठ्या काळापर्यंत सामाजिक मन व्यापून राहिले वा प्रभावित होत राहतो व अशी कथा आजही तुरळक कां होईना पण कोणाच्या तरी दृष्टीचा गंभीर विषय होऊ शकते, तर भारतीय संस्कृतीच्या अभ्यासकाना या व अशा आख्यानांची दखल घ्यावयाला हवी ! का, फक्त पाश्चात्य विचारवंताना जे महत्त्वपूर्ण वाटते, त्यापुरताच आम्ही विचार करावयाचा? आपल्या असे नक्की लक्षांत येईल कीं असा तुलनात्मक, सहानुभूतिपूर्वक व सत्यशोधनाच्या सात्विक हेतूने शोध घेतला तर ह्या शुन:शेप- कुत्र्याच्या शेपटाचा किंवा खांबाच्या तुच्छतापूर्वक अर्थ करणाऱ्या आख्यानाच्या मागे अत्यंत गूढ, अत्यंत उंचीचा मानवी प्रश्न गुंतलेला आहे. तो सर्व मानवी देहाच्या जीवनात्म्यातल्या प्रश्नांशी निगडीत आहे. मुळांत 'शुन:शेप' चा अर्थच चुकीचा लावला आहे. मग आपल्या संशोधनाची गाडी एकदम सांधा बदलून पाश्चात्य कुत्सित दृष्टी सोडून वैश्विक सृष्टी निर्मीतीतील 'पाशबध्द जीवात्म्याच्या पृथ्वीवरील मानवी अस्तित्वाबद्दल मुक्तीचा मार्ग शोधणाऱ्या समाजाचे आत्मसंशोधन व आध्यात्मिक धडपडीचा गूढ इतिहास आहे. ह्या रुळावर येईल!!

आता लक्षात येईल कीं भौतिक पाश्चात्य संस्कृती आपल्या मानेवर स्वार झालेल्या विचारवंतानी कुठल्या बौध्दिक अहंकाराच्या अवास्तव प्रभावाखाली भारतीय तत्त्वज्ञानातील एका अत्यंत महत्त्वाच्या गृढ प्रयत्नावर धूळ फेक केलेली आहे व समाजाला पूर्वग्रहदूति विचाराने भारलेले आहे!!

ही विधाने मी अगोदरच का करतो आहे? कारण कीं ही 'सावधानता' प्रथमपासूनच आपण वाचकांनी, होय तुम्हीच बाळगावयाला हवे आहे, तरच पुढील चर्चेचे खरे मर्म व अर्थ गवसतील. हे आख्यान अनेक तऱ्हेने व अनेक स्वरुपात आले असले तरी त्यातील गाळून, सांखळून जे आपल्याला मूळ हेतू, साधना व विनीयोगाच्या अर्थापर्यंत नेईल, त्याचाच उल्लेख मी या लेखांत करणार आहे. ज्यांना यापेक्षा कांही निराळी मांडणी दिसत असेल, त्यांनी ते मूळ

(पृष्ठ क्रमांक ४०पहा)

# महाराष्ट्र बालशिक्षण परिषद

## १४वे राज्यस्तरीय अधिवेशन
## वृत्तांत : २००७-२००८

*ठाण्यात भरलेली शिक्षणविषयक महत्त्वपूर्ण परिषद म्हणून बालशिक्षण परिषदेचा वृत्तांत दिशात देत आहोत. परिषदेत सादर करण्यात आलेल्या शोध निबंधाचा समावेश दिशाचा अंकांमध्ये करीत आहोत. त्यासाठी परिषदेने व ठाणे विभागातील पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल अत्यंत आभारी आहोत.- संपादक*

सामान्यतः आपण ज्याला शिक्षण म्हणतो त्या शब्दाच्या उच्चाराबरोबरच आपल्याला निरस कंटाळवाणे निर्जीव नकोसे या विशेषणांची जंत्रीच का बरे आठवते? शिक्षण आणि मजा, अभ्यास आणि आनंद यांची जोडी आपल्याला लावता येणार नाही का? बालवाडीच्या वर्गातून बाकांवर एकमेकांना बिलगून बसलेल्या बुटांनी पाय आवळलेल्या अवस्थेतील प्रत्येक वर्गातील ६०-६० / ७०-७० चिमुकड्यांना कुणी बोलायचे नाही! कुणी हसायचे नाही ! कुणी हालायचे नाही ! हे पालुपद ऐकवायचे आता तरी आपण थांबवणार आहोत का?

बालशिक्षणाच्या एकूण प्रक्रियेत शिक्षकांचे स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. ही शिक्षण प्रक्रिया उत्तम प्रकारे घडावी. शिक्षण प्रक्रियेची गुणवत्ता टिकवली जावी यासाठी बालशिक्षकांचे व प्राथमिक स्तरावरील शिक्षकांचे व्यक्तिमत्त्व विकसन तसेच शिक्षकांची भूमिका, समस्या, गरजा, अपेक्षा, हेतूने दिनांक १६,१७, व १८ नोव्हेंबर २००७ या दिवशी महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेच्या वतीने १४ वे राज्यव्यापी अधिवेशन ठाणे येथे पूर्व भागातील पी.ई. सोसायटीच्या शाळेत ठाणे शाखेतर्फे भरविण्यात आले.

शुक्रवार दिनांक १६ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.०० ते रात्री ८.०० या वेळात एकूण २ सत्रे, शनिवार दिनांक १७ रोजी २ सत्रे आणि १८ नोव्हेंबर रविवार या दिवशी सकाळी १०.०० ते १.३० या वेळेत एक सत्र अशी एकूण ५ सत्रे घेण्यात आली. सर्व सत्रांना उपस्थित सदस्य, शिक्षक, पालक, संस्थाचालक यांचा उदंड प्रतिसाद होता.

**सत्र पहिले:**



**अधिवेशनाचे उद्‌घाटन करताना-**

**श्री. विवेक सावंत, डॉ. आनंद नाडकर्णी, श्री. मधुकरराव चौधरी, ठाणे शाखेच्या अध्यक्षा कुमुदिनी बल्लाळ**

संमेलनाच्या पहिल्या सत्राचे उद्‌घाटन, महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे (MKCL) चे व्यवस्थापकीय संचालक श्री. विवेक सांवत यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलनाने झाले. या सत्राच्या व्यवस्था प्रमुख म्हणून परिषदेच्या ठाणे शाखेच्या अध्यक्षा श्रीमती कुमुदिनी बल्लाळ, श्रीमती विशाखा देशपांडे,

व श्रीमती प्राची नातू यांनी संयुक्तपणे काम केले.

श्रीमती कुमुदिनी बल्लाळ यांनी सर्वांचे स्वागत केले. त्यानंतर परिषदेच्या सचिव श्रीमती प्राची नातू यांनी परिषदेच्या कार्याचा थोडक्यात परिचय करून देत संमेलनाचे उद्दिष्ट सांगणारे प्रास्तविक केले.

उद्घाटक श्री. विवेक सावंत यांनी त्यांच्या मदतीनेच परिषदेच्या बाल शिक्षण संशोधन व विकास केंद्राने लॉंच केलेल्या New Education World वेब पोर्टलचे उद्घाटन केले व त्यानिमित्ताने उपस्थित बालशिक्षणप्रेमीना संगणकाशी मैत्री करण्याबाबत आवाहन केले. MKCL.org. या नव्याने चालू झालेल्या साईटचा वापर बालशिक्षणप्रेमींनी त्यांचे शिक्षणक्षेत्रातील ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी करावा व एखाद्या वाचनालयाला आपण जितक्या नियमितपणे भेट देऊ तितक्या नियमितपणे जवळच्या सायबर कॅफेमधे जाऊन प्रत्येकाने इंटरनेटचा लाभ घ्यावा, तरच आपल्याजवळील माहिती जगभरच्या माहितीबरोबर राहू शकेल असे ते म्हणाले. त्याचबरोबर शिक्षणक्षेत्राला व एकूणच देशातील सद्यपरिस्थितीला काही सकारात्मक वळण द्यायचे झाल्यास या बदलांची सुरुवात बालशिक्षणाच्या क्षेत्रातूनच करावी लागेल. बालकांची वाढती संख्या लक्षात घेता सर्वांना सारख्या दर्जाचे शिक्षण शास्त्रोक्त पद्धतीने मिळण्यासाठी (एक गव्हर्निंग बॉडी म्हणून) महाराष्ट्र बालशिक्षण विद्यापीठ होण्याची गरज आहे असे मनोगतही त्यांनी उपस्थितांपुढे व्यक्त केले. या प्रस्तावाचे प्रचंड टाळ्यानी स्वागत झाले.

### पुस्तक प्रकाशन व गौरव समारंभ

महाराष्ट्र बालशिक्षण परिषद - एक सिंहावलोकन २००७ आणि परिषदेच्या संशोधन व विकास केंद्राच्या बालशिक्षणाची ज्ञानगंगा या पुस्तक मालिकेच्या अंतर्गत काही पुस्तकांचे प्रकाशन प्रमुख पाहुणे मनेविकार तज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांच्या हस्ते झाले.

आपल्या छोटेखानी भाषणात मेंटॉरशिप ही संकल्पना आताच्या बालशिक्षण जगतात महत्त्वाची ठरू शकेल. असे सांगून त्यांनी मेंटोरची कल्पना लोकांपुढे मांडली, बालकांना शिक्षकाने (वयाने मोठ्या) काही सांगण्या शिकवण्यापेक्षा त्यांच्या ताई - दादांच्या मार्फत सांगितले-शिकवले तर वयाच्या आणि अनुभवाच्या काहीशी समांतर मानसिक अवस्थेमुळे कार्य सहज आणि परिणामकारक होऊ शकेल. बालशिक्षणात मनोविकाराला खूप महत्व आहे. ग्रहण करण्याच्या प्रक्रियेचा तो पाया आहे. त्याचबरोबर प्रत्येकाचा 'क्ष' वेगळा असतो. उदा. शिक्षकांचा शून्य असेल आणि बालकाचा २० असेल तर शिक्षकाना बालकाच्या बरोबर जाण्याचा प्रयत्न करावा लागेल, तरच त्यांच्यात सुसंवाद होऊ शकेल. शिक्षण आनंददायी होऊ शकेल. शिक्षकाने आपल्या अज्ञानाची लाज न बाळगता वास्तवाचा, नवलाईचा स्वीकार करावा. भाषणात शेवटी उपस्थितांना डॉ. आनंद नाडकर्णी म्हणाले की, या तीन दिवसांच्या बालशिक्षणविषयक परिषदेत अनेक नवीन विचार पुढे येणार आहेत. त्या विचारांपैकी एका विचाराचे रोप जरी प्रत्येक शिक्षक आपल्यासमवेत घेऊन गेला व त्या नवविचाराची त्याने जोपासना केली तरी लवकरच त्या विचारांचे वृक्षात रूपांतर होण्यास वेळ लागणार नाही आणि मग शिक्षणक्षेत्रातील रखरखाट दूर होईल अशी अशा त्यांनी व्यक्त केली.

त्यानंतर बालशिक्षण परिषदेचे अध्यक्ष व महाराष्ट्राचे माजी शिक्षणमंत्री मा. श्री. मधुकरराव चौधरी यांनी बालशिक्षण परिषदेच्या शिक्षणक्षेत्रतील भरीव कामगिरीबद्दल प्रशंसा केली, आणि शिक्षणमंत्री म्हणून काम पहाताना त्यांना आलेल्या अनुभवांचा पटच उपस्थितांपुढे उलगडला. तीन दिवसांच्या अधिवेशनासाठी महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेच्या सर्व कार्यकर्त्यांना शुभेच्छा दिल्या.

यानंतर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून बालशिक्षणाचे कार्य चिरंतर चालू ठेवत आलेल्या जेष्ठ

---

आपल्या उपकारकर्त्याचे उपकार विसरून, स्वार्थी माणसांत रमतो तो बुद्धिमान असून निर्बुद्धच होय! - *शि.म. परांजपे*

मान्यवरांचा सत्कार करून सन्मानीय सदस्यत्व बहाल करण्यात आले. या जेष्ठ मान्यवरांमधे डांटूच्या विमलताई कुलकर्णी, इचलकरंजीच्या हमिदा बोरवाडे, मुंबईच्या विद्याताई मुळे व श्री लक्ष्मण जोशी व पुण्याच्या शैलाताई खांबेटे यांचा समावेश होता. त्याचबरोबर दुसऱ्या दिवशी होणाऱ्या कार्यशाळांच्या विषय तज्ज्ञांचाही सत्कार यावेळी करण्यात आला. जवळजवळ दोन तास चाललेला हा उद्घाटन सोहळा खूपच रंगला. पहिल्या सत्रातील शोधनिबंधाचा विषय 'इंग्रजी बालशाळेतील भाषा विकास कार्यक्रम शिक्षकांचा दृष्टिकोन' असा होता. ठाण्यातील ए.के. जोशी या इंग्रजी माध्यम शाळेतील शिक्षिकांनी या शोधनिबंधाच्या सादरीकरणाद्वारे मातृभाषेपेक्षा वेगळ्या भाषा माध्यमांतून शिकणाऱ्या मुलांना शिकवताना येणाऱ्या समस्यांचा धांडोळा घेतला.

**दुसरे सत्र :**

**सिंधुताई अंबिके मुलाखत**

डहाणू तालूक्यात मा. अनुताई वाघ व ताराबाई मोडक यांच्याबरोबर आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले त्या सिंधुताई अंबिकेंची मुलाखत श्री. निलेश निमकर यांनी संध्याकाळच्या दुसऱ्या सत्रात घेतली. मुलाखती दरम्यान सिंधुताईंनी कोसबाड येथील अनेक आठवणींचे कथन केले. श्रीमती ताराबाई मोडक व श्रीमती अनुताई वाघ यांच्यासमवेत काम करताना आलेल्या अनुभवांचाही त्यांनी मुलाखतीत उल्लेख केला. मुलाखती दरम्यान आदिवासी पाड्यांवर शिक्षणाचे काम करताना आदिवासींच्या चालीरिती आत्मसात कराव्या लागल्या असे सांगताना सिंधुताईंनी उपस्थितांना अनेक दुर्मिळ आदिवासी लोकगीते ऐकवली. ७८ वर्षीय सिंधुताईंचा तरुणांना लाजवेल असा उत्साह पाहून सर्व उपस्थित हेलावले.

**सत्र तिसरे :**

तिसरे सत्र शनिवार दिनांक १७ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता सुरू झाले या सत्रातील प्रथम शोधनिबंधाचा विषय होता, 'प्राथमिक शिक्षकांची गणिताची समज'. लिपींग मा या चिनी संशोधिकेच्या गणितविषयक संशोधनावर आधारित चिनी व अमेरिकन प्राथमिक शिक्षकांची गणिताची समज कशी भिन्न होती यांचा तुलनात्मक अभ्यासाचा आढावा श्रीमती पूर्णिमा साठे व गीतांजली कुलकर्णी यांनी त्यांच्या शोधनिबंधातून घेतला.

पुढील शोधनिबंधाचा विषय होता - २१व्या शतकातील भावी शिक्षक श्री. हेरंब कुलकर्णी व सौ. वृषाली किन्हाळकर यानी डी.एड. व बी.एड. च्या १००० प्रशिक्षणार्थ्यांचा केलेल्या पहाणीतून हा शोधनिबंध सकारला होता. या पहाणीतून पुढे आलेला उद्याच्या शिक्षकांबाबतचे सत्य धक्कादायक आहे विदारक आहे असाच प्रत्यय शोधनिबंध वाचन ऐकणाऱ्या प्रत्येकाला आला. स्वत: श्री. हेरंब कुलकर्णी सौ. किन्हाळकर हजर न राहू शकल्याने अध्यक्ष मा. श्री. रमेश पानसे यांनी या शोधनिबंधाचे वाचन केले.

**सत्र चौथे :**

अधिवेशनाद्वारे कार्यशाळांद्वारे प्रबोधन ही विचारधारा तशी अलिकडचीच, परंतु अत्यंत प्रभावी. अधिवेशनाच्या चौथ्या सत्रात बालशिक्षक व प्राथमिक शिक्षक व पालक शिक्षणक्षेत्राबाबत आस्था असणाऱ्या मंडळींच्या जिव्हाळ्याचे असे शिक्षणसंबंधातील २० निरनिराळे विषय निवडून दु.३ ते सांय.६ या दरम्यान २० समांतर कार्यशाळांचे आयोजन परिषदेने केले. पंपेटस्, गणित, देहबोलीतून अभिव्यक्ती, बालवाडी प्रकल्पपद्धती हे या समांतर कार्यशाळेतील काही अभिनव विषय होते. या विषयांखेरीज इतरही अनेक विषयांवर कार्यशाळांमधून तज्ज्ञांकडून उहापोह केला गेला. त्यानंतर बालशिक्षिकांनी एका सांस्कृतिक कार्यक्रमातून बालगीतांची देवाण घेवाण केली.

**पाचवे सत्र :**

रविवार दिनांक १८ नोव्हेंबर रोजी अधिवेशनाच्या पाचव्या सत्राची सुरुवात अहमदनगरच्या श्रीम. गीता गिल्डा यांच्या 'प्रभावी बालशिक्षणसाठी प्रभावी शिक्षक एक चिकित्सक अभ्यास' या शोधनिबंधाच्या वाचनाने झाली. नगर सारख्या ठिकाणी मुख्याध्यापिका म्हणून काम बघताना काय अनुभव येतात काय समस्यांना तोंड द्यावे लागते व त्या परिस्थितीतही प्रभावी शिक्षण कसे देता येते याचा व्यक्तिगत स्वरूपाचा आढावा श्रीम. गिल्डा यांनी या शोधनिबंधाद्वारे घेतला.

यानंतर ठाण्याच्या सरस्वती मंदिर टस्ट्र, पूर्व प्राथमिक विभाग, नौपाडा, ठाणे या शाळेच्या वतीने मुख्याध्यापिका श्रीमती रोहिणी रसाळ यांनी शिक्षण पत्रिकेच्या नजरेतून शिक्षक या आगळ्यावेगळ्या व शिक्षकांना प्रेरित करणाऱ्या शोधनिबंधाचे वाचन केले (शिक्षण पत्रिका हे नूतन बालशिक्षण संघाचे मासिक, परिषदेचे मुखपत्र आहे.) या निबंधाद्वारे ४० वर्षातील शिक्षणपत्रिका मासिकांतून मांडली गेलेली शिक्षक विषयक भूमिका उलगडून दाखविण्यात आली.

अधिवेशनाद्वारे शिक्षिक, पालक, संस्थाचालक यांचे प्रबोधन होऊन अनौपचारिक व आनंददायी बालशिक्षणाचा पुरस्कार व प्रचार तर होतोच, पण त्या जोडीने यजमान शाखा व राज्यभरातील परिषदेचे कार्यकर्ते यांची संघटनात्मक पातळीवर चांगली तयारी होते. मुख्य प्रवाहाबाहेर गेलेले कार्यकर्ते पुन्हा येऊन मिळतात. इतर कार्यकर्ते व त्यांच्या कार्याचा परिचय होतो. म्हणूनच बालशिक्षण परिषद दरवर्षी नोव्हेंबर महिन्यात राज्यव्यापी अधिवेशन आयोजित करते.

अधिवेशनाची सांगता खुले अधिवेशन व समारोप या समारभांनी झाली. हे अधिवेशन सर्व प्रतिनिधींना व उपस्थितांना अतिशय उद्‌बोधक वाटल्याचे त्यानी दिलेल्या प्रतिक्रियांवरून जाणवले. ठाण्यातून व राज्यातील वेगवेगळ्या २५जिल्ह्यातून सुमारे ६०० बालशिक्षक या तीन दिवसीय अधिवेशनास उपस्थित होते. परिषदेच्या ठाणे शाखेच्या वतीने उपस्थितांची केलेली व्यवस्था व अगदी उत्तम होती. आता पुढील वर्षीचे अधिवेशन वाई येथे भरणार अशी उत्साहपूर्ण चर्चा प्रतिनिधींकडून ऐकावयास मिळणे हीच या अधिवेशनाच्या यशाची पावती म्हणावी लागेल.

**स्वाती गोखले,**
महाराष्ट्र बालशिक्षण परिषद,
ठाणे जिल्हा शाखा
दूरध्वनी.: २५३६२५४२

# इंग्रजी बालशाळेतील भाषा विकासाचा कार्यक्रम - शिक्षकांचा दृष्टिकोन

*बाल शिक्षण परिषदेत आमच्या शाळेतील शिक्षकांनी सादर केलेला हा शोधनिबंध - संपादक*

सद्य परिस्थितीचे अवलोकन करता महानगरातील इंग्रजी माध्यम शाळांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. परिणामी इंग्रजी माध्यम बालशाळांचे प्रमाणही वाढताना दिसून येते.

या शाळेत येणाऱ्या सर्वच मुलांची प्रथम भाषा इंग्रजी नसते. पण शिकण्याचे माध्यम मात्र इंग्रजी असते. त्यामुळे मुलांना त्रास होतो.

बालवाडीत होणारा भाषाविकास हा मुलांच्या पुढील शिक्षणावर प्रभाव टाकणारा असतो. त्यामुळेच बालशाळेतील शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या संवादावर मर्यादा येतात. साहजिकच, मुलांच्या अभिव्यक्तीवर सुद्धा मर्यादा येतात. या अशा परिस्थितीत बालशाळेतील भाषाविकासाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे हे दिसून येते. म्हणूनच, बालशाळेतील भाषा विकास कार्यक्रम कसा असावा याबाबत शिक्षकांचा दृष्टिकोन जाणून घेणे आवश्यक वाटले.

याच विचारातून केलेला हा अभ्यास -

**ए.के. जोशी शाळेचे धोरण**

* गेली जवळपास ६ वर्षे आम्ही ए. के. जोशी शाळेत हसत - खेळत शिक्षणपद्धतीत भाषा विकास कार्यक्रम राबवीत आहोत. त्याची ठळक वैशिष्टे :-

१) इंग्रजी माध्यमाची शाळा असूनही प्रथम भाषेचा स्वीकार करून संवादात भाषेचा अडसर येऊ नये असे वातावरण मुलांना देणे ही शाळेची भूमिका आहे.

२) मुलांचा मातृभाषेकडून इंग्रजीकडे जाण्याचा प्रवास एकदम न होता टप्प्याटप्प्याने होणार आहे हे गृहीत धरून संभाषणासाठी एकाच भाषेचा आग्रह न धरता संमिश्र भाषांचा वापर केला जातो.

३) जिथे समज तयार होत आहे, तिथे प्रसंगी स्वभाषेतून अभिव्यक्ती करण्याची मोकळीक दिली जाते.

४) लेखन, वाचन पूर्वतयारीचा कार्यक्रम मुलांच्या वयाला साजेसा ठेवून संभाषण व अभिव्यक्ती याकडे जास्तीत जास्त भर देणे.

५) बालशाळेतील इतर विषयांत म्हणजे गणित, गाषा, परिसर अभ्यास इ. मध्ये सुद्धा भाषा विकास होतो हे तत्त्व लक्षात ठेवणे भाषिक अंगाचा वेगळा विचार करणे.

आमच्या या भूमिकेशी ठाणे शहरातील विविध शाळांतील शिक्षक कितपत सहमत आहेत त्यांचे याबाबतचे विचार जाणून घेणे.

शिक्षकांचा दृष्टिकोन जाणून घ्यावा या हेतूने या विषयाची निवड केली.

**❊ या अभ्यासाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे:-**

१) इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकणाऱ्या मुलांच्या प्रथम भाषेबद्दल शिक्षकांचा दृष्टिकोन जाणून घेणे.

२) बालशाळेतील भाषाशिक्षणाच्या पध्दतीविषयी शिक्षकांचा दृष्टिकोन समजून घेणे.

३) बालशाळेतील संभाषण कौशल्याबाबत शिक्षकांची भूमिका समजून घेणे.

४) बालशाळेतील लेखन वाचन कार्यक्रमांबाबत शिक्षकांचे विचार जाणून घेणे.

**मतावली / प्रश्नावलीची निर्मिती :-**

* हा सर्व अभ्यास करण्यासाठी सर्वप्रथम जवळपासच्या ४-५ शाळांमध्ये जसे श्री मा बालनिकेतन, भगवती विद्यालय, ब्राह्मण विद्यालय, पीपल्स एज्यु. या शाळांत जाऊन शिक्षकांशी चर्चा केली. या चर्चेतून समोर आलेल्या काही मुद्यांवरून मतावली कशी तयार करावी याबाबत निश्चितता आली.

१० मुद्यांवर शिक्षकांसाठी मतावली व ५ प्रश्नांवर प्रश्नावलीची निर्मिती झाली.

| क्रमांक | विषय | Set A मतावली | Set B प्रश्नावली |
|---|---|---|---|
| १ | प्रथम भाषा स्वीकार | १,३,४ | - |
| २ | भाषा शिक्षण पध्दत | १० | १,२ |
| ३ | संभाषण कौशल्य | २,६,९ | ३ |
| ४ | लेखन वाचन कार्यक्रम | ५,७,८ | ४,५ |
| | तक्ता क्र. | १ | |

**शाळांची निवड**

✻ **इंटरनेटच्या सहाय्याने**

www.indianchild.com/school-in-thanehtml

या संकेतस्थळावरून ठाणे शहरातील शाळांची यादी मिळवली. इंग्रजी माध्यमाच्या १६ बालशाळा ठाणे शहरात आहेत अशी माहिती मिळाली. यापैकी १२ शाळांनी सहकार्य केले. यातून ६१ शिक्षकांची विविध मुद्यांवरची मत जाणून घेतली गेली.

**शिक्षकांची पार्श्वभूमी**

ज्या शिक्षकांना मतावली व प्रश्नावली दिली, त्या सर्व शिक्षकांची माहिती पुढील मुद्यांनुसार संकलित केले.

१) शिक्षकांची शैक्षणिक पात्रता

२) नोकरीपूर्व प्रशिक्षण

३) नोकरीत रूजु झाल्यावर घेतलेले प्रशिक्षण

४) अनुभव

या सर्वांची थोडक्यात माहिती घेण्यात आली. ती खालील तक्त्यात दिली आहे.

**१) शैक्षणिक पात्रता –**

| शिक्षण | शिक्षक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| दहावी | ७ | ११% |
| बारावी | १३ | २१% |
| पदवीधर | ३८ | ६३% |
| पदव्युत्तर / Ph.D | ३ | ५% |
| | तक्ता क्र. २ | |

वरील आकडेवारी अस दर्शवते की अधिकतर शिक्षक पदवीधर आहेत.

**२) नोकरीपूर्व प्रशिक्षण :**

| | शिक्षण | शिक्षक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | मॉंटेसरी अभ्यासक्रम | ३० | ४९% |
| २. | इ.सी.सी.एड | २७ | ४४% |
| ३. | बी.एच.एस.सी. | १ | २% |
| ४. | इतर कोणतेही | ३ | ५% |
| | तक्ता क्र. ३ | | |

अधिकांश म्हणजे जवळजवळ ५०% शिक्षकांनी मॉंटेसरीचा अभ्यासक्रम पूर्ण केलेला आहे.

**३) नोकरीत असताना घेतलेले प्रशिक्षण**

एकूण शिक्षकांपैकी फक्त २२ म्हणजे ३६% शिक्षकांनीच नोकरी लागल्यावर प्रशिक्षण घेतले. उर्वरित ६४% शिक्षकांचा नोकरी लागल्यावर कुठलेही प्रशिक्षण घेण्याकडे कल दिसत नाही. शिक्षकांनी शैक्षणिक क्षेत्रातील नवीन उपक्रमांची आणि पद्धतींची माहिती वेळोवेळी घेतली नाही तर, त्यांच्या कामावर (शिकविण्यावर) परिणाम होण्याची शक्यता आहे. म्हणून सर्व संस्थांनी वेळोवेळी शिक्षकांच्या प्रशिक्षणाचा विचार करावा असे वाटते.

**४) अनुभव**

| शिक्षण | शिक्षक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| ०-६ वर्षे | ३१ | ५१% |
| ७-१३ वर्षे | १४ | २३% |
| १४-२० वर्षे | ८ | १३% |
| २१-२७ वर्षे | ८ | १३% |
| | तक्ता क्र. ४ | |

**मुलांच्या प्रथम भाषेचा स्वीकार - उद्दिष्ट**

१) इंग्रजी बालशाळेत लहान गटाला शिकविणाऱ्या शिक्षकांनी शिकविताना संमिश्र भाषांचा वापर करावा कारण बऱ्याच मुलांना इंग्रजीतील संभाषण समजत नाही.

पूर्णपणे - काही प्रमाणात

बऱ्याच अंशी - अजिबात नाही.

वरील विधानाशी ए.के. जोशी शाळेतील शिक्षक पूर्णपणे सहमत आहेत.

इंग्रजी बालशाळेत जेव्हा मुले येतात, तेव्हा त्यांची प्रथम भाषा इंग्रजी नसून वेगळी असते. त्यामुळेच शिक्षकांनी फक्त इंग्रजीत केलेले संभाषण मुलांना समजत नाही. भाषा हा संवादाचा दुवा न बनता अडसर बनतो.

पाहणीत असे दिसून आले की केवळ ९.८४% शिक्षक या मताशी पूर्णपणे सहमत आहेत. ७०.५% शिक्षक या विधानाशी काही प्रमाणात सहमत आहेत.

भाषा हा शिक्षणातील अडसर आहे हे फारच कमी शिक्षकांना मान्य आहे. सर्वाधिक शिक्षक काही प्रमाणात वरील विधानाला पाठिंबा देतात, याचे कारण प्रत्यक्षात त्यांना दोन भाषांचा वापर करावाच लागतो.

शाळांचे याबाबत अधिकृत धोरण असणे आवश्यक आहे असे वाटते.

२) इंग्रजी माध्यम बालशाळेतील शिक्षकांनी इंग्रजी व्यतिरिक्त इतर भाषेतील गाणी व बडबडगीते शिकवली पाहिजेत.

वरील विधानाशी ए.के. जोशी शाळेतील शिक्षक संपूर्णत: सहमत आहेत. गाणी आणि गोष्टींचा प्रमुख उद्देश मुलांना निखळ आनंद मिळावा हा असतो. म्हणूनच यात कुठल्याही भाषेचा अडसर हसू नये अशी शाळेची भूमिका आहे.

११% शिक्षक वरील विधानाशी पूर्णपणे सहमत

आहेत. तर ७२% शिक्षक या मताशी काही प्रमाणात सहमत आहेत.

याही बाबतीत शाळांनी एकत्र येऊन निश्चित धोरण ठरवणे आवश्यक आहे.

३) इंग्रजी माध्यमाच्या बालशाळेतील मुलांनी शिक्षिकेशी पहिल्या दिवसापासूनच इंग्रजीतून संभाषण केले पाहिजे. या विधानाशी ए.के. जोशी शाळेतील शिक्षक असहमत आहेत. मुलांची प्रथम भाषा इंग्रजी नसल्याने त्यांचा शब्दसंग्रह अपुरा असतो. पहिल्या दिवसापासून केवळ इंग्रजीतूनच संभाषण करण्याचा आग्रह धरला तर त्यांच्या अभिव्यक्तीवर मर्यादा येतात.

संवादात अडथळा आल्याने हळूहळू मुले संभाषण टाळतात.

६.६% शिक्षक वरील विधानाशी असहमत आहेत.५९% शिक्षक विधानाशी काही प्रमाणात सहमत आहेत. मुलांच्या प्रथम भाषेचा स्वीकार झाला पाहिजे. असे धोरण सर्व शाळांनी ठेवले पाहिजे. इंग्रजीतूनच बोलण्याची सक्ती हे धोरण घातक असू शकते, असे वाटते.

**भाषा शिक्षण पद्धती**

१) बालशाळेत खडू, फळा आणि पुस्तक यांच्या सहाय्याने व्याकरण शिकविण्यापेक्षा कृतीद्वारा शिकवणे योग्य आहे. वरील विधानाशी ए.के. जोशी शाळेतील शिक्षक संपूर्णत: सहमत आहेत.

बालशाळेत येणाऱ्या मुलांच्या वयोगटात लेखन, वाचन येत नाही यामुळेच खडू, फळ्यापेक्षा कृतीतून मुलांना व्याकरण समजणे जास्त सोपे जाते. समजलेल्या गोष्टी बोली भाषेत वापरणे मुलांना सहज शक्य होते. व्याकरण वेगळे न शिकवता कृतीद्वारे शिकवणे यामुळेच जास्त परिणामकारक ठरते.

केलेल्या पाहणीनुसार जवळपास ५०% शिक्षक कृतीद्वारा व्याकरण शिकवावे या मताचे आहेत.

या वयातील मुलांची लेखन, वाचनाची क्षमता नसल्याने व्याकरण कृतीद्वारा शिकवणे निश्चितच अधिक प्रभावी ठरू शकते. या दृष्टीने शाळांनी व्याकरणाचे पाठ कसे शिकवले जावेत यावर एकत्र येऊन चर्चेतून निर्णय घेणे गरजेचे वाटते.

२) बालशाळेतील भाषा विकास कार्यक्रमासाठी खाली नमूद केलेल्या क्षेत्रांपैकी सर्वात योग्य क्षेत्र निवडा.

a) भाषा ऐकणे व बोलणे b) वाचन
c) लेखन d) व्याकरण

वरील विधानासाठी दिलेल्या क्षेत्रापैकी (a) हे क्षेत्र ए.के. जोशी शाळेतील शिक्षकांना सर्वोत्तम वाटते. कुठलीही नवीन भाषा शिकण्यासाठी ती भाषा जास्तीत जास्त ऐकणे व बोलणे अतिशय महत्त्वाचे असते. भाषा विकास १००% धरला तर प्रथम तो प्रत्येकी ३०% ऐकणे, बोलणे, वाचणे यामुळे होतो. म्हणून भाषा ऐकणे आणि बोलणे सर्वात गरजेचे वाटते.

आकडेवारी असे दर्शविते की ९६.१%शिक्षक या पर्यायाशी सहमत आहेत. ही समाधानाची बाब आहे.

३) भाषा विकासासाठी खालीलपैकी कोणती कृती मदत करेल.

a) एखाद्या वस्तू वा चित्रासंबंधी बोलणे b) अक्षरे उतरवणे c) धावणे d) गोष्ट तोंडपाठ करणे

या पर्याया पैकी (a) या पर्यायाला ए.के. जोशी शाळेच्या शिक्षकांची सहमती आहे.

प्रथम भाषा इंग्रजी नसल्याने मुलांचा शब्दसंग्रह अपुरा असतो. समोर ठेवलेल्या वस्तू या चित्राबाबत बोलताना शब्दसंग्रह वाढण्यास त्यांना खूप मदत होते. यातूनच भाषा

विकासात सुद्धा मदत होते. मुलांनी चित्र या वस्तूचे केलेले निरीक्षण त्यांना आपल्या स्वत:च्या शब्दात मांडण्यास वाव मिळतो. व्याकरणाचा योग्य वापर सुद्धा मुलांना शिकवता येतो. म्हणून चित्रवाचन वा वस्तूवर्णन ही कृती भाषा विकासात मदत करणारी आहे.

९५.१% शिक्षक पर्यायाशी सहमत आहेत. पण शिक्षकांशी चर्चा करताना या कृती फारच कमी प्रमाणात घेतल्या जातात, असे लक्षात आले.

**संभाषण कौशल्याबाबत**

१) शिक्षकांनी पालकांना काही सूचनांची यादी दिली पाहिजे, ज्या सूचना मूल पाठ करून, लक्षात ठेवून त्यांचा वापर करू शकतील.

(उदा. May I drink water? May I wash my hands?)

या विधानाशी ए.के. जोशी शाळेतील शिक्षक असहमत आहेत.

सूचनांचा अर्थ न कळता त्या फक्त पाठ करणे योग्य नाही. त्या विशिष्ट सूचनेचा अर्थ समजला तरच त्याद्वारे अपेक्षित असलेली कृती प्रत्यक्षात आणणे सोपे जाईल. रोजच्या व्यवहारात मुलांकडून सूचनांचे पालन करणे म्हणजे त्यानुसार कृती करणे शक्य होईल.

३४.४% शिक्षक या विधानाशी पूर्ण असहमत आहेत. तर ३६.१% शिक्षक काही अंशी या विधानाचे समर्थन करतात. (३४.४ + ३६.१ = ७०%)

याबाबतीत जास्तीत जास्त म्हणजे अधिकांश शिक्षकांचा विचार योग्य आहे.

२) शिक्षिकेने आठवड्यातून दोनदा मुलांना चित्र दाखवून, मुलांनी तोडक्या मोडक्या इंग्रजीतून बोलले तरीही बोलण्याची संधी दिली पाहिजे.

या विधानाशी ए.के. जोशी शाळेतील शिक्षक पूर्णपणे सहमत आहेत.

चित्र वाचन हे भाषा विकासाचे उत्तम साधन आहे. चित्र वाचनाचे अनेक फायदे आहेत. यामुळे मुलांची निरीक्षणशक्ती वाढते. तसेच निरीक्षण केलेल्या गोष्टी स्वत:च्या शब्दांत मांडण्याचा प्रयत्न मुले करतात. यामुळे त्यांच्या शब्दसंग्रहात भर पडते. परिणामी भाषा विकासात याची खूप चांगली मदत होते.

३) गोष्ट लक्षात ठेवण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे ती पाठ करणे. बालशाळेतील मुलांनी गोष्टी पाठ कराव्यात म्हणजे परीक्षेच्यावेळी बरोबर सांगता येतील.

वरील विधानाशी ए.के. जोशी शाळेतील शिक्षक असहमत आहेत.

गोष्टीचा मूळ उद्देश मुलांना निखळ आनंद मिळावा हाच असतो. पण तीच गोष्ट अर्थ न समजता पाठ केल्याने मुले त्यातील आनंदापासून वंचित राहतात. ह्या ऐवजी तीच गोष्ट समजून आपल्या शब्दात मांडणे ते जास्त उपयोगी ठरते.

फक्त १३.१% शिक्षक या वाक्याशी असहमत आहेत. याचाच अर्थ ८७% शिक्षकांच्या मते गोष्टी या मुलांच्या आंनद व करमणुकीसाठी नसुन केवळ पाठांतर व परीक्षेसाठीच असतात. ही खरोखरच चिंतेची बाब आहे.

४) राजू हा ग्रामीण भागातून आलेला सीनीयर केजी मधे शिकणारा मुलगा आहे. तो त्याच्या शिक्षिकेशी हिंदीतून बोलणे पसंत करतो.

याबाबतीत शिक्षिकेची भूमिका काय असावी?

a) राजूला शिक्षिकेशी इंग्रजीतूनच बोलावे लागेल.

b) राजूच्या पालकांनी त्याच्याशी इंग्रजीतून संभाषण करावे.

c) राजूने लक्षपूर्वक ऐकून त्याला कृतीद्वारा इंग्रजीतून उत्तर द्यावे.

d) पालकांनी मुलाला शिकवणीला पाठवावे असा सल्ला देणे.

वरील परिस्थितीत ए.के. जोशी शाळेतील शिक्षकांचे (c) हे मत आहे.

राजूला इंग्रजी भाषा पूर्णपणे नवीन आहे, शिवाय ही त्याची प्रथम भाषा निश्चितच नाही. या कारणांनी राजू व शिक्षिकेच्या संभाषणात भाषेचा अडसर निर्माण होतो. म्हणून, शिक्षिकेने कृतीद्वारे राजूला मदत केली तर इंग्रजी समजणे त्याला सोपे जाईल.

९३.४% शिक्षक या मताशी सहमत आहेत. ही टक्केवारी अस दर्शवते की अधिकांश शिक्षक मुलांना इंग्रजी समजण्यासाठी प्रोत्साहन देतात.

**लेखन वाचन कार्यक्रम**

१) ज्युनियर के.जी. च्या लेखन कार्यक्रमात प्रामुख्याने Print letters द्यावीत व सिनियर के.जी. च्या शेवटी Cursive लिहिण्यास सुरुवात करावी.

वरील विधानाशी ए.के. जोशी शाळेतील शिक्षिका असहमत आहेत. कारण छोटा शिशु (ज्यनियर केजी) (३ १/२ - ४ १/२ yrs.) या वयोगटातील मुलांचे हाताचे स्नायू लिहिण्यास परिपक्व नसतात. ते करण्यासाठी मुलांना लेखनपूर्व तयारीची अतिशय गरज असते. असे असूनही फक्त २१.३% शिक्षक असहमत आहेत.

मुलांना सुरुवातीला print letters शिकवली जातात व पुढच्या वर्गात त्यांना Cursive letters शिकवतात. यामुळे प्रचंड प्रमाणात गोंधळ उडण्याची शक्यता असते मुलांचा हा गोंधळ टाळण्याकरता शाळांनी दोन्ही प्रकारे अक्षरे लिहिण्याचा आग्रह धरू नये.

२) अक्षरे लिहिण्याची सुरुवात सिनीयर केजी च्या दुसऱ्या सत्रात केली पाहिजे, कारण या वयापर्यंत मुले लिहिण्यास परिपक्व होतात.

वरील विधानाशी ए.के. जोशी शाळेतील शिक्षिका संपूर्णत: सहमत आहोत.

सिनी. के.जी. च्या दुसऱ्या सत्रापर्यंत मुलांचे हाताचे स्नायू पूर्णपर्ण विकसित झालेले असतात. यामुळे पेन्सिल हातात धरून ताणविरहित लेखन करणे मुलांना सहज शक्य होते. फक्त १४.१% शिक्षक मुलांना सिनियर केजीत लिखाण सुरू करावे, या मताशी सहमत आहेत. ६०% शिक्षक या मताच्या पूर्णपणे विरोधात आहेत. त्यांच्या मते लिखाण खूप आधी सुरू केले पाहिजे. बऱ्याच शाळांमधे मुलांचे स्नायू विकसित होण्याआधीच त्यांना लिखाण दिले जाते.

३) जर बालशाळेतील मुले फळ्यावरच्या सूचना उतरवून घेऊ शकली, तर त्यांना इ. १ ली च्या अभ्यासक्रमाशी जुळवून घेणे सोपे जाईल. म्हणून बालशाळेतील शिक्षकांनी सिनियर केजीतच ही सवय लावली पाहिजे.

वरील विधानाशी ए.के. जोशी शाळेतील शिक्षिका असहमत आहेत.

शिक्षकांनी फळ्यावर लिहिलेले अर्थ न कळता नुसतेच आपल्या वहीत उतरवून घेणे योग्य नाही आणि त्या कृतीचा इयत्ता पहिलीच्या प्रगतीशी काहीही संबंध नाही.

असे असूनही, फक्त १.६४% शिक्षक आमच्या मतांशी सहमत आहेत. म्हणजे ९८% शिक्षक लिखाण व मुलांची प्रगती याचा परस्पर संबंध जोडत आहेत.

४) Set - B स्नेहा साडेतीन वर्षाची असून ज्यूनी. केजी त आहे. शिक्षिकेने फळ्यावर लिहिलेली अक्षरे तिला

लिहिता येत नाहीत ती म्हणते, ''अक्षरे लिहिणे कंटाळवाणे आहे आणि तिचे हात दुखायला लागतात.'' या बाबत शिक्षिकेची काय भूमिका असावी.

a) शाळेच्या वेळेनंतर तिला अधिक सराव देणे

b) गृहपाठ देऊन पालकांना लक्ष देण्यास सांगणे

c) तिला थोडा वेळ देऊन चिकणमाती व मणी ओवणे यासारखे खेळ देणे

d) तिच्या वहीत अक्षरे लिहून देऊन ती काढावयास सांगणे.

वरील पर्यायांपैकी (c) या पर्यायांशी ए.के. जोशी शाळेतील शिक्षक सहमत आहेत.

साडेतीन वर्षे वयात मुलांचे हाताचे स्नायू विकसित झालेले नसतात. जर ह्या वयात मुलांवर लिहिण्याची सक्ती केली तर स्नायूंवर ताण येतो व हात दुखतात, परिणामी लेखन त्यांना कंटाळवाणे वाटते.

७३.८% शिक्षक या मताशी सहमत आहेत. पण प्रत्यक्षात मात्र ज्युनी.केजी. च्या मुलांपासून लेखनाची सुरुवात केली जाते. ही आर्श्चयाची गोष्ट आहे.

५) Set-B मिसेस राधा नायर नर्सरी चालवतात. त्यांनी मुलांना अक्षरे व अंकाची (१ ते १०) किमान ओळख करून द्यावी अशी पालकांची अपेक्षा आहे म्हणजे मुलांना बालशाळेत समजणे सोपे जाईल. मिसेस नायर यांनी काय करावे.

a) व्यवसायाच्या मदतीने लेखन, वाचनाचा कार्यक्रम आखणे.

b) नर्सरीत येणारी मुले लेखन व वाचन करायला खूप लहान आहेत असे पालकांना समजावून सांगावे.

c) दर महिन्याला फक्त एकच अंक व अक्षर शिकवणे.

d) पालकांची मागणी दुर्लक्षित करणे.

ए.के. जोशी शाळेतील शिक्षक या परिस्थितीत मिसेस. नायर यांना (b) पर्याय सुचवू इच्छितात.

नर्सरीचा मूळ हेतू मुलांचा सामाजिक व भावनिक विकास व्हावा असा असतो. म्हणूनच तिथे औपचारिक कार्यक्रमाची (लेखन व वाचन) काहीच गरज नसते. फक्त ३१.१% शिक्षक मिसेस. राधा नायर यांना (b) हा पर्याय सुचवतात. ४१% शिक्षकांच्या मते पालकांची मागणी लक्षात घेऊन मि. नायर यांनी लेखन व वाचन कार्यक्रमाची आखणी वर्कबुकच्या सहाय्याने करावी.

**सारांश**

आपणासमोर सादर केलेल्या विषयाबद्दल थोडक्यात पण महत्वाचे -

१) प्रथम भाषा स्वीकार या उद्दिष्टाअंतर्गत विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरांवरून असे दिसून येते की, बऱ्याच शाळांमधे मिश्र भाषांचा,इंग्रजी खेरीज इतर भाषांतील बडबडगीते, गाणी यांचा स्वीकार केला जातो. तसेच बऱ्याच शाळांमधे सुरुवातीपासून मुलांनी इंग्रजीतच बोलले पाहिजे असा आग्रह धरला जात नाही. तरी अजून काही शाळांमधे वर नमूद केलेल्या गोष्टी मान्य केल्या जात नाहीत.

२) भाषाशिक्षण पद्धत याअंतर्गत शिक्षकांच्या मतांवरून असे दिसून येते की त्यांना भाषा विकासासाठी भाषा ऐकणे तसेच बोलणे जास्त महत्त्वाचे वाटते पण जेव्हा यासाठी चित्रवाचन, वस्तूवर्णन यासारख्या कृतींचा उत्तम पर्याय म्हणून त्याला अनुमती देतात पण जेव्हा व्याकरणाचा मुद्दा येतो तेव्हा जवळपास ५०% शिक्षकांना व्याकरण शिकवण्यास खडू व फळा कृतीपेक्षा अधिक महत्त्वाचे वाटते. तिथे बोलणे ऐकणे या गोष्टींना शिक्षकांचा फारसा पाठिंबा दिसत नाही. हा विरोधाभास दिसून येतो.

३) संभाषण कौशल्य या उद्दिष्टाखाली विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरावरून जवळपास ७०% शिक्षकांच्या मते मुलांनी सुचना पाठ करून त्याचा रोजच्या व्यवहारात वापर करावा असे मत आहे.गोष्टींच्या बाबतीत सुद्धा शिक्षकांना पाठांतरच महत्वाचे वाटते. जेव्हा राजूची घटना आपण बघतो तेव्हा अधिकांश शिक्षकांचा राजुला कृतीद्वारे समजवण्याकडे कल दिसतो. मग सूचना आणि गोष्टींच्या बाबतीत पाठांतरापेक्षा शिक्षक कृतीद्वारे समजवण्याचा प्रयत्न का करत नाहीत असा प्रश्न पडतो.

४) लेखन, वाचन कार्यक्रमाअंतर्गत असे स्पष्ट चित्र दिसते की मुलांच्या हाताचे स्नायू विकसित होण्या अगोदरच त्यांच्यावर लेखनाची सक्ती / अपेक्षा केली जाते. त्यामुळे त्यांच्यावर ताण येतो. लेखन वाचनाचा सरळ संबंध मुलांच्या पुढील इयत्तांच्या प्रगतीशी लावला जातो. भाषा समजून स्वत:च्या शब्दांत विचार मांडता येणे म्हणजे भाषा समजणे होय. लेखन ही भाषा विकासाची शेवटची पायरी आहे.

पण प्रत्यक्षात मात्र लेखनावर अधिकांश शाळांत सक्ती केली जाते जे तितकेसे योग्य वाटत नाही. ह्या सगळयावरून ही गोष्ट ठळकपणे जाणवते की सर्व बालशाळांनी एकत्र येऊन चर्चेतून बालशाळेच्या भाषा विकास कार्यक्रमाची आखणी करावी व त्यात सुसूत्रता आणावी असे वाटते.

**अभ्यासाच्या मर्यादा**

इंग्रजी बालशाळेतील भाषा विकास कार्यक्रम - शिक्षकांचा दृष्टिकोन

या विषयावर केलेला संक्षिप्त अभ्यास आपल्यासमोर मांडला. या अभ्यासाच्या काही मर्यादा पुढील प्रमाणे -

१) मिळालेल्या बालशाळांच्या यादीतील सर्वच शाळांकडून सहकार्य मिळाले नाही.

२) शिक्षकांची मते प्रश्नावलीत, मतावलीत जाणून घेण्यास नकार दिला.

३) मतावली व प्रश्नावलीचाच एक भाग म्हणून शिक्षकांची माहिती सुद्धा होती. शिक्षकांची माहिती देण्यास काही शाळांनी नकार दिला.

४) या अभ्यासाचा एक भाग होता विविध शाळांत जाऊन प्रत्यक्ष वर्ग चालू असताना निरीक्षण करणे. या बाबतीतसुद्धा शाळा निरुत्साहीच दिसल्या.

**सौ. प्रिती कुळकर्णी, सौ. अपर्णा वरूडकर**
पूर्व प्राथमिक विभाग,
सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यमिक शाळा,
नौपाडा, ठाणे.

# परिसरवार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर

### पूर्व प्राथमिक विभाग

डॉ. बेडेकर विद्या मंदिर, पूर्व प्राथमिक विभागाचे 'वार्षिक स्नेहसंमेल' व 'पारितोषिक वितरण समारंभ' शनिवार दि. २२/१२/२००७ रोजी विद्यालंकार सभागृहात साजरा झाला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणी म्हणून बालकलाकार कु. मनाली संदीप कुलकर्णी हिला बोलावण्यात आले.

अपंगत्वावर मात करुन राष्ट्रपती पुरस्कार मिळवणारी मनाली हिची मुलाखत मोठ्या शिशुच्या कु. हर्षल जोगळेकर व कु. सिद्धी कोळेकर यांनी घेतली. या मुलाखतीत सौ. केळकरबाईंनी साथ देऊन रंगत आणली.


कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून विद्या प्रसरक मंडळाचे सभासद श्री. करंदीकर, श्री. दिलीप जोशी व मुख्याध्यापिका सौ. वाघरेबाई उपस्थित होत्या. स्नेहसंमेलनाच्या आधी लहान व मोठ्या शिशुच्या विद्यार्थ्यांच्या विविध वेशभुषा व क्रीडास्पर्धा घेण्यात आल्या. ह्या स्पर्धांची बक्षिसे स्नेहसंमेलनात बालकलाकारांच्या हस्ते देण्यात आली.

सांस्कृतिक कार्यक्रमाच्या विषयावर लहान व मोठ्या शिशुच्या विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर नृत्ये सादर करुन प्रेक्षकांची उत्स्फूर्त दाद मिळविली. उपस्थिताचे स्वागत पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. विदुल वैद्य यांनी केले.

- ४, ५, ६ डिसे. रोजी इ. ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांचा वार्षिक क्रीडा-महोत्सव पार पडला. त्यावेळी घेतलेल्या वैयक्तिक स्पर्धामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.
- सप्टें ०७ मध्ये झालेल्या 'डॉ. होभी भाभा बालवैज्ञानिक' स्पर्धा परीक्षेचा निकाल लागला त्यात इ. ६ वी च्या ७ विद्यार्थ्याची प्रयोग परीक्षेसाठी, ४० विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रासाठी तसेच इ. ९ वीच्या ३ विद्यार्थ्यांची प्रयोग परीक्षेसाठी व ६ विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रासाठी निवड झाली.
- श्री माँ बालनिकेतन येथे झालेल्या 'आंतरशालेय पुष्परचना' स्पर्धेत ८वी अ मधील मृण्मयी कोळी हिला प्रथम क्रमांक मिळाला.
- कु. ओंकार कुचित (८) इ. याचे जलतरण स्पर्धेतील यशाचा आलेख -कळवा येथे झालेल्या स्पर्धेत-

  ५० मी. प्रिस्टाईल - ३ रा क्रमांक
  ५० मी. बटरफ्लाय - ३ रा क्रमांक

  लांब पल्ल्याच्या खुल्या सागरी स्पर्धेत ६ कि. मी. अंतर १ तास ४३ मी. ५६ सेकंदात पूर्ण केले.



डॉ. ललिता नामजोशी

- दि. १६ व १७ डिसें. रोजी इ. ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांचा 'वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व स्नेहसंमेलन' विद्यालंकार सभागृहात झाले. इ. ५, ६, ७ वी च्या कार्यक्रमास खगोल अभ्यासक व



खगोलशास्त्रज्ञ दा. कृ. सोमण

पंचागकर्ते श्री. दा. कृ. सोमण व इ. ८, ९, १० वी च्या कार्यक्रमास डॉ. ललिता नामजोशी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. दोन्ही कार्यक्रमास आदरणीय श्री. श्री. वि. करंदीकर अध्यक्षस्थानी होते. त्यांनी विद्यार्थ्यांना उत्तम मार्गदर्शन केले.

- जिल्हा परिषद ठाणे, आयोजित तालुका विज्ञान प्रदर्शन दि. १७ ते १९ डिसें. या कालावधीत भारतरत्न इंदिरा गांधी विद्यालय, सावरकर नगर, ठाणे येथे सपंन्न झाले. प्रदर्शनात इ. ६वीच्या विद्याथर्यांनी 'पूर्व सूचक यंत्र' व ९ वी च्या विद्यार्थ्यांनी 'ऊस आणि ऊसातील आंतरपिके' हा प्रकल्प सादर केला. सर्वांना प्रशस्तीपत्रके मिळाली.
- सप्टे. मध्ये घेतल्या गेलेल्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या एलिमेंटरी परीक्षा व प्री-एलिमेंटरी परीक्षेत इ. ६ वी चा १०० % व इ. ७ वी चा ९८% निकाल लागला.
- भारतरत्न इंदिरा गांधी विद्यालय सावरकर नगर ठाणे येथे दि. २२ डिसें रोजी 'ग्रंथाली वाचक दिन सोहळा' निमित्त लहान पण महान गावे या संकल्पनेवर आधारित पिपरी-चिंचवड जुने नवे गाव यावर इ. ८ वीतील विद्यार्थ्यांनी सौ. सुमिता माने यांच्या मार्गदर्शनाखाली उत्कृष्ट कार्यक्रम सादर केला.
- भारत स्काऊट गाईड विभागातर्फे आयोजित 'राष्ट्रीय जांबोरी स्काऊट गाईड कॅम्प' २५ ते ३१ डिसें. या कालावधीत दिल्ली येथे पार पडला. महाराष्ट्र स्टेट कलर पार्टोत दोन गाईडसनी नेतृत्व करुन ७ वी ते ९ वीच्या २२ विद्यार्थ्यांसह दोन शिक्षकांनी कॅम्प यशस्वीरित्या पूर्ण केला.
- ऑगस्ट ०७ मध्ये झालेल्या गणित संबोध परीक्षेचा निकाल ६५% लागला. डिसें. ०७ मध्ये झालेल्या गणित प्रावीण्य परीक्षेत १० विद्यार्थ्यांची गणित प्रज्ञा परीक्षेसाठी निवड झाली. कु. अक्षया पाटील (५वी) ठाणे जिल्हयात अनुक्रमे पहिली व सहावी आली.
- नवभारत राष्ट्रीय ज्ञानपीठ (दादर) आयोजित 'राष्ट्रीय मराठी प्रवीण परीक्षा' डिसें. ०६ मध्ये त्यात कु. ओमकर सोमा सावंत ७ ब यांस 'आदर्श विद्यार्थी' म्हणून पारितोषिक प्राप्त झाले.
- ठाणे नगर वाचन मंदिर, ठाणे आयोजित निबंध स्पर्धेत अपेक्षा श्याम धाकोरकर (१० अ) प्रथम क्रमांक व चिन्मयी प्रशांत खानोलकर (९अ) हिस द्वितीय क्रमांक मिळाला.
- ३१ डिसें. व १ जाने. रोजी माजी पालक श्री. राजे यांनी १० वीसाठी आयोजिलेल्या व्याख्यानात एकाग्रता व मन:शक्ती वाढविण्यासाठी १०० ते १ अंकांची उजळणी करुन 'चितन व मनाला स्वयंसूचना' यांचा सुंदर मिलाप विद्यार्थ्यांना समजावून दिला.
- नववर्ष २००८ च्या पूर्वसंध्येला दि. ३१ डिसें. २००८ रोजी मा. मुख्याध्यापिका सौ. उषा कळमकर यांनी दुपार विभागातील मुलांशी संवाद साधला. माजी राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या

जीवनातील किस्सा, लेखक यदुनाथ थत्ते यांच्या शालेय जीवनातील प्रसंग सांगून विद्यार्थ्यांनी स्वत:चे मूल्यमापन करावयास शिकावे, नवीन वर्षात गुणी विद्यार्थी व्हावे, खूप अभ्यास करावा असा संदेश दिला.

- दि. ३० नोव्हें. रोजी मा. मुख्याध्यापिका सौ. सविता केळकर यांचा शुभेच्छा समारंभ झाला. अध्यक्षस्थानी श्री. श्री. वि. करंदीकर होते. याप्रसंगी माजी मुख्या. अशोक चिटणीस, सौ. अल्पना बापट, लिला जोशी यांनी शिक्षण प्रकियेबद्दल आपले मौलिक विचार सांगितले.



**श्रीकृष्ण उदय मुणगेकर**

- पुणे येथे झालेल्या दुसऱ्या 'नॅशनल स्मार्ट किडस् क्रियेशन' (ॲबॅकस) स्पर्धेत श्रीकृष्ण उदय मुणगेकर (६ब) याचा गटातून तिसरा क्रमांक आला असून पुढील आंतरराष्ट्रीय पातळीवर ८ मार्च ला सिंगापूरला होणाऱ्या स्पर्धेसाठी त्याची निवड झाली.
- ५ जाने. ०८ विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाने आयोजित केलेल्या "National Conference on Latest Trends in Nanotechonology" या कार्यशाळेस सौ. कुमावत व श्री. भोईर हे उपस्थित होते.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यमिक शाळा

### प्राथमिक विभाग

**नाईट स्टे:** मुलांना पूर्ण स्वावलंबी बनविण्यासाठी आम्ही प्राथमिक विभागात मुलांना घरापासून दूर ठेवून शाळेतच शिक्षकांबरोबर रात्र घालविण्यास तयार करतो. ह्या वर्षी १ डिसेंबर रोजी पहिलीची चिमुरडी मुले आपल्या सर्व सामानासकट हसत हसत आई वडिलांना टाटा करत शाळेचा जीना चढले. मुलांसाठी सर्व शिक्षकांनी करमुणीकीचे कार्यक्रम आयोजित केलेले होते. त्यात त्यांनी पपेट शो सादर केला. मुलांनी गाणी, नाच वगैरे करुन शिक्षकांची करमणूक केली. रात्री जेवणानंतर कॅम्प फायरच्या वेळी सर्वांनी गाणी म्हणून थंडीला पळवले. आपला बिछाना स्वत: तयार करुन हसत मजेत खेळत मुले निद्राधीन झाली. सकाळी दूध पिऊन स्वत:च बिछाना आवरुन सर्व शिक्षकांचा जड मनाने निरोप घेऊन घरी गेली.

गीता प्रतिष्ठानतर्फे घेण्यात आलेल्या गीता स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे :

शर्विन नंदकुमार जोशी (इयत्ता ३ री) व सानिका शेटे (इयत्ता ४ थी) यांस विशेष श्रेणी प्राप्त झाली. त्यांनी १२ वा अध्याय उत्तम सादर केला.

- गायत्री उमेश जोशी
- अनिकेत महेश बर्वे
- नेहा विनायक दीक्षित
- ऋतुजा संजय दप्तरदार

या सर्व चौथीच्या विद्यार्थ्यांना विशेष श्रेणी प्राप्त झाली. त्यांनी गीतेचा १५ वा अध्याय सादर केला होता.

'सुरवाणी बालवत्स मंदिरम' यांनी आयोजित केलेल्या संस्कृत कथाकथन स्पर्धेत ईशा पुणतांबेकर हीस दुसऱ्या क्रमाकांचे बक्षीस मिळाले.

**शिक्षक आणि विद्यार्थ्यांना मिळालेली पारितोषिक-**

ब्राह्मण सेवा संघाचा आदर्श शिक्षक पुरस्कार सौ. मेघा लाड यांना तर उपवन लायनेस क्लबचा आदर्श शिक्षक पुरस्कार सौ. शर्मिला नायर यांना मिळाला.

उपवन लायनेस क्लबचा आदर्श विद्यार्थी पुरस्कार कु. प्राची जोशी हिला मिळाला.

**डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा २००७-०८ चा निकाल:**

निकाल : १००%

| | इ. ६ वी | इ. ९ वी |
|---|---|---|
| परीक्षेला बसलेले विद्यार्थी | ३८ | ८ |
| प्रात्यक्षिक परीक्षेसाठी पात्र विद्यार्थी | १४ | ३ |
| प्रमाणपत्र मिळवणारे विद्यार्थी | २४ | ५ |

कर्नाटक येथे झालेल्या ५३ व्या राष्टीय बास्केट बॉल स्पर्धेत कु. ऐश्वर्या ओक हिने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले आणि सुवर्णपदक मिळवले.

## (१५ डिसेंबर ते १० जानेवारी) जोशी-बेडेकर महाविद्यालय

बुधवार, दि. १९ डिसें. रोजी महाविद्यालयात नवरंग वार्षिक उत्सव जल्लोशात सुरु झाला. उत्सवाचा प्रारंभ वार्षिक क्रीडा स्पर्धेने झाला. विद्यार्थी खेळाडूंबरोबरच शिक्षकांनीही स्पर्धेत भाग घेऊन खेळाची रंगत वाढवली. याच दिवशी मेंहदी, केशरचना, रांगोळी इ. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच प्रश्नावली, बातमीवाचन व लेखन, निबंध, वक्तृत्व इ. स्पर्धाही आयोजित करण्यात आल्या.

✦ गुरुवार दि. २० डिसें. रोजी निर्मिती कला व नाटुकले या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.

✦ शनिवार, दि. २२ डिसें. रोजी नृत्यस्पर्धा, संगीतस्पर्धा आयोजित करण्यात आल्या.

✦ सोमवार, दि. २४ डिसें. रोजी व्यक्तिमत्त्व-स्पर्धा तसेच पुष्परचना व सलाड-डेकोरेशन या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

✦ शनिवार दि. ५ जाने. रोजी इंग्रजी विभागात विभागाच्याच तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेला कालिदासकविविरचित अभिज्ञानशाकुन्तलम् या नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला. हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या कात्यायन सभागृहात सकाळी ११.०० वाजता झाला.

✦ सोमवार, दि. ७ जाने. रोजी हिन्दी विभागातर्फे हिन्दी साहित्य मंडळाचे उद्घाटन डॉ. रतनकुमार पाण्डेय, अधिव्याख्याता, हिन्दी विभाग, मुंबई विद्यापीठ यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी त्यांचे आधुनिक हिन्दी कविता का स्वर्णकाल-छायावाद या विषयावर व्याख्यान झाले.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय, ठाणे

महाराष्ट शासन व मुंबई उच्च न्यायालयाच्या वतीने आयोजित महाराष्ट्र न्यायनिकेतनाच्या उत्तन येथे झालेल्या कोनशिला समारंभास मुंबई उच्च न्यायालयाचे नोंदणी अधिकारी आणि ठाण्याचे मुख्य जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे विशेष आमंत्रित म्हणून विद्या प्रसारक मंडळाच्या ठाणे विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या काही प्राध्यापक व ३६ विद्यार्थी उपस्थित होते.

मा. न्यायाधीश श्री. पटेल यांनी आपल्या स्वागतपर भाषणात न्यायाधीशांना त्यांच्या कामात कणखर मनाची व तत्त्वांची गरज असल्याचे प्रतिपादन केले ते पुढे म्हणाले ''न्यायनिकेतन म्हणजे एखादा मठ असून न्यायाधीश म्हणजे त्यातील भिक्षू आहेत.'' तर मध्यस्थी केंद्राचे महत्त्व विषद करताना त्यांनी महाभारतातील श्रीकृष्णाच्या भूमिकेची

आठवण करुन दिली.

बऱ्याच वर्षापासूंन प्रलंबित असलेले न्यायनिकेतनाचे काम सुरु झाल्याने त्यासाठी शुभेच्छा देऊन मुंबई उच्च न्यायालायाचे मुख्य न्यायाधिश श्री. स्वतंत्रकुमार यांनी न्यायाधीशांचे ज्ञान अद्ययावत ठेवणे तसेच त्यांना प्रशिक्षित करण्यासाठी न्यायनिकेतनाची भूमिका महत्त्वाची असल्याची सांगितले. न्यायनिकेतनात संशोधन तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन खटल्यांचा निकाल लवकरात लवकर लागावे यासाठी प्रयत्न करावेत. कायदा हे समाजसुधारणेचे शास्त्र असल्याने तो विज्ञानाप्रमाणे शिकण्यासाठी न्यायनिकेतन ही प्रयोगशाळा व्हावी जेणेकरुन न्यायिक सुधारणा व एकूणच न्यायव्यवस्थेला बळकटी येईल असे त्यांनी नमूद केले.

सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश श्री. के. जी. बालकृष्णन् यांनी आपल्या उद्‌घाटनपर भाषणात महाराष्टातील कायद्याच्या अभ्यासाबद्दल समाधान व्यक्त केले. खटल्याच्या निकालाबाबत न्यायाधीशांच्या त्यांनी केलेल्या प्रशंसेचे सगळ्यांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. त्याबरोबरच त्यांनी न्यायाधीशांची संख्या कमी असल्याची खंत, तसेच ती रिक्तपदे त्वरीत भरण्याची आणि त्यांची संख्या वाढविण्याची गरज व्यक्त केली.

न्यायाधीशांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणामुळे प्रलंबित खटल्यांची संख्या नक्किच कमी होईल तसेच न्यायनिकेतनातील कोर्टाचे व्यवस्थापन आणि निकालपत्र तयार करण्याचा सराव यासारख्या प्रशिक्षणामुळे न्यायाधीशांचे कौशल्य तर वाढेलच परंतु वाढत्या खटल्यांची संख्या कमी करण्यातही मदत होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आपल्या भाषणात न्यायमूर्तींनी Negotiable Instrument Act कलम १३८ चेक वठले न जाणे, या खटल्यांची वाढ होत आहे परंतु मोठमोठ्या उद्योगधंद्यांचे मालक मात्र तो फौजदारी खटला असल्याने कोर्ट फी देखील न देता सुटत आहेत. याबद्दल खंत व्यक्त केली पण त्याचबरोबर न्यायधीशांना आपल्यासमोर असलेल्या सर्व खटल्यांची तपशीलवार तसेच एकूण खटल्यांची नोंद ठेवता यायला हवी, या व्यवस्थापनामुळे न्यायप्रक्रियेत नक्कीच सुलभता येईल यावर त्यांनी जोर दिला. जाता जाता त्यांनी उत्तनसारख्या नैसर्गिक सौंदर्य असलेल्या ठिकाणी हे न्यायनिकेतन उभे राहत आहे याबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले.

मा. न्यायाधीश एस्. बी. म्हसे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रमानंतरच्या चहापानाच्या सत्रात विद्याथर्यांना न्यायाधीश व वकिलांशी संवाद साधण्याची संधी मिळाली. ठाण्याचे मुख्य जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. हेमंत देशपांडे यांनी विद्यार्थ्यांशी हितगुज करुन त्यांना प्रोत्साहन दिले. मुंबई बॉम्बस्फोट खटल्यातील न्यायाधीश व कॉलेजचे माजी विद्यार्थी श्री. कोदे यांनी देखील विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात विशष रस दाखविला.

या कार्यक्रमामुळे मान्यवरांचे विचार प्रत्यक्ष ऐकण्याची दुर्लभ संधी विद्यार्थ्यांना मिळाली.

**''कायदा सल्ला व सेवा प्राधिकरणांतर्गत कार्य करणाऱ्या वकिलांच्या समस्या''**

दि. ५ ऑक्टोबर रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या ठाणे विधी महाविद्यालयात टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स अंतर्गत कायदा व न्याय यासाठी कार्य करणारी सामाजिक संस्था 'प्रयास' ठाणे जिल्हा कायदा सल्ला व सेवा प्राधिकरण आणि ठाणे विधी महाविद्यालय आयोजित 'कायदा सल्ला व सेवा प्राधिकरणांतर्गत कार्य करणाऱ्या वकिलांच्या समस्या व योजना' या विषयावर चर्चासत्र आयोजित केले होते. चर्चासत्रास ठाणे जिल्हा मुख्य व सत्र

न्यायाधीश श्री. एच्. एस्. देशपांडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्घाटन झाले. मोफत कायदा सल्ला व सेवा ह्या सामाजिक कार्यात वकील, सामाकजत संस्थांन बरोबरच विद्यार्थ्यांचाही सहभाग आवश्यक असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्तविक महाविद्यालाच्या प्रभारी प्राचार्या सौ. श्रीविद्या जयाकुमार, तर उपस्थित मान्यवर न्यायाधीशंची ओळख व स्वागत महाविद्यालयातील प्राध्यापक ॲड. श्री. सुनील परांजपे यांनी केले. या चर्चासत्रास ठाणे जिल्हा न्यायालय क्र. ३ व क्र ४ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्री. डब्ल्यू. के. सांगळे तसेच दिवाणी न्यायाधीश वरिष्ट स्तर कु. एम. आर. शर्मा मुख्य न्यायदंडाधिकारी श्री. आर. पी. पांडे आणि इतरही विविध न्यायालयातील न्यायाधीश मोठ्या संख्येने उपस्थित हेते. चर्चासत्राचा हेतू व प्रयासची ओळख सामाजिक कार्यकर्ते श्री सिलविन काळे यांनी विषद केला. ठाणे जिल्हा मध्यवर्ती कारागृहाचे अधिक्षक श्री. चव्हाण यांनी खटला सुरु होण्याच्या प्रतिक्षेत असणाऱ्या कैद्यांना कायद्याची मदत मिळण्याबाबतच्या समस्या उपस्थितांसमोर मांडल्या.

राजस्थानचे निवृत्त कारागृह महानिरिक्षक श्री. सक्सेना यांनीही चर्चासत्रात आपले अनुभव व काही समस्यांवर विद्यार्थ्यांच्या मदतीने करता येण्यासारख्या उपाययोजना सांगितल्या, तर जिल्हा न्यायालयातील ॲड. श्री. एस्. आर. पराड व ॲड. श्री. विकास कदम यांनी कायदा सल्ला व सेवा प्राधिकरणाचे वकील व सामाजिक कार्यकर्ते यांचा या संदर्भातला सहभाग व समस्या यावर आपले विचार मांडले तसेच प्रयासचे सामाजिक कार्यकर्ते श्री. मुरलीधर जगताप यांनी कायदा सल्ला व सेवा प्रत्यक्ष खटल्यांबाबत घेताना येणाऱ्या अडचणी मांडल्या. तर ॲड. विशाल कानडे यांनी कायदा सल्ला व सेवा प्राधिकरण, सामाजिक संस्था व विद्यार्थ्यांचा समन्वय असेल तर कैद्यांना आणि पर्यायाने विद्यार्थ्यांनाही असा लाभ होतो याचे स्वानुभव कथन केले. प्रयासचे प्रकल्प अधिकारी श्री. विजय राघवन यांनी चर्चासत्राच्या उपस्थित झालेल्या विषय समस्या व सूचना यातून मार्ग काढून त्या कार्यन्वित होणे गरजेचे आहे असे सूचित केले. चर्चासत्राच्या शेवटी ठाणे विधी महाविद्यालयाच्या वतीनेही प्राध्यापक, विद्यार्थी आणि सामाजिक संस्था यांच्या सहकार्याने यासंदर्भात भरीव कामगिरी करण्याचे आश्वासन प्रभारी प्राचार्या सौ. श्रीविद्या जयाकुमार यांनी दिले. चर्चासत्रात उपस्थितांचे आभार प्रयास प्रकल्पांतर्गत कार्य करणारे श्री. आशिष यांनी मानले.

चर्चासत्र यशस्वी करण्यासाठी विद्यार्थी प्रतिनिधी मंडळाने परिश्रम घेतले.

**प्रथम वर्ष एल्. एल. बी. वक्तृत्व स्पर्धा -**

ठाणे विधी महाविद्यालयात प्रथम वर्ष एल्.एल्. बी. च्या विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा दिनांक १८ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ६.०० वाजता महाविद्यालयाच्या एव्ही रुम मध्ये आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेचा विषय- Is India shining? हा होता. स्पर्धेत एकूण २० विद्यार्थ्यांनी भाग घेतला. प्रा. आनंद म. कासले आणि प्रा. सतीश शर्मा यांनी परीक्षकांची भूमिका पार पाडली. इंग्रजी विभागात अनुक्रमे कु. भाग्यश्री जोशी आणि कु. हरमीत कौर यांनी प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावला. मराठी व हिंदी विभागात कु. प्रियांका बने आणि डॉ. सिंग यांनी अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावला. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या सौ. श्रीविद्या जयाकुमार यांनी मार्गदर्शन केले.

**रक्तदान शिबिर-**

ठाणे विधी महाविद्यालयात दिनांक १ सप्टें. रोजी सायंकाळी ६ वाजता अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आणि कै. वामनराव ओक रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते, विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला.

**जिमखाना-**

ठाणे विधी महाविद्यालयातर्फे दिनांक १०,११,१२ सप्टें. रोजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या जिमखान्यामध्ये विधी विद्यार्थ्यांसाठी विविध खेळांमध्ये भाग घेण्यासाठी सोयीसुविधा पुरविण्यात आल्या. विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या सौ. श्रीविद्या जयाकुमार यांनी स्टुंडट कौन्सिलच्या सहकार्याने हा सुत्य उपक्रम पार पाडला.

**तरुणाई -**

विधी महाविद्यालयात दिनांक १३ सप्टें. रोजी 'तरुणाई' या आकर्षक शिर्षकाखाली विद्यार्थी-शिक्षक स्नेहसंम्मेलन अतिशय जल्लोषात पार पडले. विधी महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री. आनंद कासले यांच्या पुढाकाराने विद्यार्थी प्रतिनिधी मंडळाने हे स्नेहसंम्मेलन यशस्वी केले.

प्रभारी प्राचार्या सौ. श्रीविद्या जयाकुमार व इतर सहकारी प्राध्यापक आणि विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी थोरले बाजीराव पेशवे सभागृहात मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्नेहसंम्मेलनाची सुरुवात श्रीमती शिंदे यांच्या सरस्वती वंदनेने झाली. स्टुडंट कौन्सिलचे सांस्कृतिक कार्यवाह श्री. प्रविण दोंड यांनी संयोजनाची धुरा वाहिली. प्रा. आनंद कासले यांनी स्वागतपर भाषण केले. विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रमाद्वारे आपले कलागुण दाखविले. यात प्रामुख्याने गायन, काव्यवाचन, अभिनय इ. कलांचा समावेश होता. स्टुंडट कौन्सिलचे जनरल सेक्रेटरी श्री. विवेक जोशी यांनी उपस्थितांचे आभार मानले. कु. पटवर्धन हिच्या संत ज्ञानेश्वरांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**अभिनंदन-**

कुमारी धमेजा सॅन्सी या विद्यार्थीनीने मुंबई विद्यापीठाने एप्रिल ०७ मध्ये घेतलेल्या प्रथमवर्ष एल्.एल्.बी. च्या परीक्षेत संपूर्ण विद्यापीठामध्ये प्रथम क्रमांक पटकाविला. ती सुवर्णपदक, रोख बक्षिस आणि शिष्यवृत्ती याची मानकरी ठरली. तिला विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या सौ. श्रीविद्या जयाकुमार यांचे बहुमोल मार्गदर्शन मिळाले होते.

## विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

(स्थापना : १ ऑगस्ट १९३५)

### विद्या प्रसारक मंडळाच्या घटक संस्था

१) डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मराठी माध्यम)
२) सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम विद्यालय (इंग्रजी)
३) बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालय
४) के. ग. जोशी कला महाविद्यालय
५) ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय
६) वि. प्र. मंडळाचे टी. एम्. सी. विधी महाविद्यालय
७) वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन
८) प्रगत अभ्यास केंद्र
९) डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यासक्रम संस्था

# देण्यांपराध क्षमापन स्तोत्र

*या महिन्यातील शाकांभरी नवरात्रीच्या निमित्ताने - संपादक*

न मंत्र जाणत मी स्तुतिही न जाणतसे
आवाहन ध्यान तसे स्तुतिपर कथाही न जाणत मी
तुझ्या मुद्रा वा आळवणींचेही ज्ञान न मजला
पण आश्रये तुझ्या दुःखे सरतील जाणत मी १.

न ठावे रीत पूजेची तसा आळशी निर्धनही मी
केले न पूजन म्हणूनि त्वपदाही अंतरलो मी
तरी जगद्उद्धारिणी पार्वती उद्धर मज
पुत्र निपजे वाईट परि कुमाता न कधी २.

जगी असती सच्छिल तुझी सारीच मुले
परि अवखळसा मीच एक विरळ मुलगा
त्यागशील जरी मज न ठरे ते उचित परी
पुत्र निपजे वाईट परि कुमाता न कधी ३.

जगन्माते न रचिली कधी पदसेवा
दिले नाही कधी द्रव्यही तुजला
तरी अतुलनीय प्रेम करिसी मजवरी
पुत्र निपजे वाईट परि कुमाता न कधी ४.

पूजाविधीसेवा कसूनि बहू भागलो मी
त्यजुनि देव पंच्याऐशी वय गाठले मी
हे गणाधीश माते, करिसी कृपा जरी मजवरी
अनिकेत अवस्था मग जाऊ कोणा शरण मी ५.

हे माते खलही गोड वदुनि वक्ता बनती
रंकही बाळगे सुवर्ण कोटीचे जवळी
प्रभांव मंत्रातील एकाक्षराचा असा
मग जपावर्तनांनी फळ किती अगाळे मिळते ६.

जटाधारी चिताभस्म लेपुनि विष पितो
कंठी सर्प माळांचे हार धारण करतो
तरी विश्वाचा स्वामी म्हणुनि मान्य जगती
वरले तुज जन्मांती तयाचेच फल प्राप्त त्याने ७.

मोक्षाची नसे कांक्षा न सुख प्रपंचाचे
विशिष्ट ज्ञानही नको न सुख कोणतेही
हे मृडानी रुद्राणी शिव शिव भवानी जपत
जन्म सरावा मम हेच इच्छित मी ८.

शास्त्रानुसार न पूजिले तुला आजवर मी
अपशब्द वदुनि चिंतिले कुविचारच मी
श्यामले निराधार जो मी त्या मजसी
तारशील तर उचितचि होईल ते ९.

बुडालो संकटी म्हणुनि स्मरतो तुला
असे न मानी देवी करुणासागर तू
न लबाड हेतू मनी माझिया
भुकेले बालक स्मरते मातेला १०.

हे माते कृपा झालिया तुझी
न नवल ठरेल ते जगती
अपराध मग्न मुलगा असुनि
माता कधी न दुर्लक्षी तयाशी ११.

जगी न मज सम पापी पापानाशिनीतुजसम
हे जाणुनि महादेवी जे योग्य असेल तेच करी १२.
श्रीशंकराचार्य विरचित देण्यापराध क्षमापन
स्तोत्रं संपूर्णम दुर्गार्पणमस्तु

पद्यानुवाद... प्रा. मोहन पाठक, ठाणे

(पान क्र. १९ वरून)

**भारतीय संस्कृती- बीज, मॉडेल व साधना**

संदर्भ जरूर धुंडाळावेत !!

**हा एक पूर्वार्ध**

हा लेख केवळ 'पूर्वार्ध' समजावा. पुढच्या म्हणजे उत्तरार्थ लेखात खालील गोष्टींची मांडणी करण्याचे योजिले आहे.

१) 'शुन:शेप' म्हणजे पृथ्वीवर आलेल्या जीवात्म्याने आपल्या स्वत:च्याच आत्म्याला ज्या 'पाशांनी' एका यज्ञाच्या युपाला बांधले आहे. त्याची प्रथम जाणीव होण्यासाठी केलेली धडपड.

२) त्या पाशातून मुक्तता होण्यासाठी केलेले प्रयत्न ह्या प्रयत्नांची ढोबळ वर्णने आख्यानांत आढळतील.

३) या पृथ्वीवरील यज्ञ कृतींची रुपरेषा व प्रत्यक्षकृती करण्याचे त्याचे प्रयत्न.

४) या करिता काही योगिक, वेदिक, आध्यात्मिक व इतर प्रयत्नांची माहिती, खरे अर्थ, खरी नाती जाणणे.

५) उर्ध्वरेत कुंडलिनी जागृती

६) प्रवर्ग्य, त्रेताग्नि साधना यज्ञक्रिया

७) सोम रसाची निर्मिती व विनियोग.

तेव्हा, ही चर्चा वा कथा आपण पुढल्या लेखात करू या.

(पूर्वार्ध)

**श्री. यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट, सारस्वत बँकेजवळ,
अग्यारी लेन, ठाणे
दूरध्वनीः 25368450
भ्रमणभाष : 9892046519
ईमेल: yrsane@eth.net

**संपादकीय** (मुखपृष्ठावरून)

सीमारेषा इतक्या अस्पष्ट आहेत की गैरसमजच वाढतात. केवळ पदवीसाठी किंवा पैशासाठी प्रेरित होऊन केलेली संशोधने तळागाळातील लोकांच्या जीवनमानात क्रांती घडवू शकतील काय?

परंतु हस्तिदंती मनोऱ्यात बसून संशोधानाचा पसरा मांडणारांना 'तळागाळातील' भारत माहीतच नसतो. ही बुद्धिमान मंडळी 'आता गरीब कुठे उरलेत' असे विचारतात 'आहे रे आणि नाही रे' यांतील दरी त्यांच्यां मते उरलेलीच नसते. पण, हे वास्तव आाहे काय? संवेदनशील वातावरणात, प्रचंड पैसा खर्च करून होणारी संशोधने एका रात्रीत समाजाभिमुख होणार नाहीत याची नेहरूंना नक्कीच जाण होती. पण इतक्या वर्षांनंतरही मूठभरांसाठी होणारी संशोधने सर्वसामान्यांच्या जीवनाची गुणवत्ता सुधारणारी होत नाहीत. तोवर समाजापासून लांब राहणारे हे तथाकथित संशोधक, वैज्ञानिक जनतेच्या पैशांचा अपव्ययच करत राहतील.

नेहरुंना अपेक्षित असणारा विज्ञान क्षेत्रात प्रगत असणारा भारत हा नक्कीच नाही. ग्रांथिक संशोधनाच्या खंदकापासून हा समाज अजूनही दूरच आहे.

यासाठी देशांतील अनेक क्षेत्रांतील तीव्रतर प्रश्नांचा आवाका लक्षात घेऊनच विद्यापीठ अनुदान आयोगाने समाजोपयोगी विषय बनवावेत व त्यावर संशोधकांना संशोधन करायला लावावे. आजचे सर्व संशोधन प्रकल्प, विषय तपासून पहायला हवेत. ज्या संशोधनामुळे पर्यावरणाविषयक प्रश्न अधिकच बिकट होतील, आर्थिक प्रश्न गुंतागुंतीचे बनतील, आरोग्यविषयक प्रगत मूलभूत सेवा महाग होत जातील अशी संशोधने कशासाठी हवीत? समाजाभिमुख मधील 'समाज हितैषी', यातील समाजाचे हित लक्षात घेतले जाणार नसेल तर प्रगतीच्या दिशा तपासूनच पहाव्यात !



# पसायदान

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें  तोषावे ।तोषोनि मज द्यावे ।पसायदान हें ॥ १ ॥

जे खळांची व्यकटी सांडो । तया सत्कर्मी रति वाढो ।भूतां परस्परें पडो । मैत्र जीवांचे ॥२  ॥

दूरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो जो जे वांछिल तो तें लाहो । प्राणिजात ॥ ३ ॥

वर्षत सकळमंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ॥ ४  ॥

चला कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणीचे गांव ।  बोलते ते अर्णव । पीयूषाचे ॥५  ॥

चंद्रमे जे अलांछन  । मार्तंड जे तापहीन ।ते सर्वाही सदा सज्जन ।  सोयरे होतु  ॥ ६ ॥

किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होऊनि तिही लोकीं ।भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ॥७ ॥

आणि ग्रंथोपजीविंये । विशेषीं लोकीं इयें । दृष्टादृष्ट विजयें ।  हो आवें जी ॥ ८ ॥

येथ म्हणे विश्वेश्वरावो । हा होईल दानपसावो । येणें वरें ज्ञानदेवो ।  सुखया जाला ॥ ९ ॥

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**


विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

# थोरले बाजीराव पेशवे सभागृह

☆ ३०० आसनांची व्यवस्था

☆ अद्ययावत दृक्श्राव्य यंत्रणा

☆ उपाहाराची व्यवस्था

☆ वहाने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

☆ प्रसन्न वातावरण

संपर्क

कार्यवाह,

विद्या प्रसारक मंडळ,

नौपाडा, ठाणे ४०० ६०२.

**दूरध्वनी : २५४२ ६२७०**


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिंटर्स, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ येथून प्रकाशित केले.